


ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

जून २०१० • मूल्य १० रुपये









'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त नुकताच त्यांचा पुण्यात जाहीर सत्कार करण्यात आला. त्यावेळी पुण्याचे महापौर मोहनसिंग राजपाल,
खा. सुप्रिया सुळे, शशी लक्षमण माने, लक्ष्मण माने, भाई वैद्य, रामदास आठवले व नामदेव ढसाळ.

याच निमित्ताने 'ग्रंथाली' प्रकाशित 'सम्यक् परिवर्तन' आणि 'रेषेपलीकडील लक्ष्मण' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले.

## 'लालबाग' पुस्तकाचे प्रकाशन




प्रकाशनावेळी दत्ता इस्वलकर, अशोक हांडे, अच्युत पालव व लेखक आदिनाथ हरवंदे

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**जून २०१०**
**वर्ष ३० वे, अंक सहावा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **दिलीप चावरे**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

न्यू जर्सी येथे पार पडलेल्या नाट्यसंमेलनात केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि आयडिअल रोड बिल्डर्सचे दत्तात्रय म्हैसकर यांनी अडीच कोटी रुपयांची 'संयुक्त'देणगी देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. पारितोषिके विभागून देण्याचा प्रघात आपल्याकडे आहे, परंतु देणगी विभागून देण्याची संकल्पना तशी नवीन वाटते. नाट्यसंमेलनाच्या आधी बरेच रामायण घडले. अर्थात ते मराठी परंपरेला साजेसेच होते. साहित्य संमेलन असो अथवा शिवाजी महाराजांची जयंती, वादविवाद महाराष्ट्राच्या संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहेत. कोणतीही गोष्ट महाराष्ट्रात निर्विघ्न पार पडत नसावी असे वाटू लागले आहे. मराठी बाणा असे ज्याचे वर्णन करण्यात येते तो हा तर नसावा? असो. आता हे अडीच कोटी रुपये कधी हाती येतात आणि त्यांचा विनियोग कसा होतो हे पाहण्याची उत्सुकता रसिकजनांना लागली आहे. पवार अध्यक्ष असलेल्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयावरही पवारांच्या मायेचा शिडकावा होईल का, याची आस मराठीप्रेमींना सतावते आहे. महाराष्ट्र शासन असो की मुंबई महानगरपालिका, कारभार सारखाच. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाला राज्य शासनाने अनेक वर्षांपूर्वी जाहीर केलेली देणगी अद्याप मंत्रालयातून ग्रंथसंग्रहालयाच्या मुख्यालयापर्यंत पोचते आहे. महानगरपालिकेने तर यावरही कडी केली आहे. मंजूर झालेले अनुदान ग्रंथसंग्रहालयास देण्याबाबत गेली अनेक वर्षे टाळाटाळ सुरू आहे. दोन्हीकडे मराठीचा जाज्वल्य अभिमान असलेल्या मंडळींची रेलचेल आहे. परंतु हे प्रेम प्रत्यक्षात झिरपत नाही. ते जाहीर भाषणांपुरतेच मर्यादित राहते. मराठीपण सर्वत्र असेच आहे. सरकारी अनुदानाशिवाय साहित्य संमेलने भरवण्यासाठी मराठी महाकोष ही संकल्पना मांडण्यात आली. महाकोषावरील व्याजातून संमेलनाचा खर्च भागवावा अशी त्यामागील भूमिका होती. त्या महाकोषात ५०-६० लाख रुपये जमा झाल्याचे मध्यंतरी जाहीर करण्यात आले होते. ही गेल्या दहा वर्षांतली 'प्रगती'! त्याग इतरांनी करावा, मी फक्त सल्ला देईन असे आपले रोखठोक धोरण असते. सगळेच असे ठाम राहिले की कोणत्याही संकल्पाचे काय होणार हे सांगायला ज्योतिषाची गरजच नाही. सध्या महाराष्ट्र अत्यंत बिकट अवस्थेतून चालला आहे असे म्हटले जाते. या बिकटपणाची छाया साहित्य संमेलन अथवा नाट्यसंमेलन यांच्यावर पडली नाही हे मराठी सारस्वताचे नशीब म्हणायला हवे. आता प्रतीक्षा आहे बहुचर्चित सांस्कृतिक धोरणाच्या अंमलबजावणीची. ती सुरू झाली की महाराष्ट्राला चहू अंगांनी बहर येईल.

दरम्यान, यंदा तरी पाऊस चांगला व्हावा हीच प्रार्थना.

**– संपादक**

# चंदेरी दुनियेतील अदृश्य तारा

## कुमार नवाथे

श्रीकांत धोंगडे गेली पस्तीस वर्षे हिंदी चित्रपटसृष्टीच्या जाहिरात व्यवसायात भक्कम पाय रोवून उभे आहेत हे ऐकूनच मला त्यांना भेटण्याची तीव्र इच्छा झाली. त्यांचा गरिबीचा भूतकाळ, त्यांचं रोजचं पुणे-मुंबई जाणं-येणं, त्यांचे मोठ्या निर्मात्यांबरोबरचे घरगुती संबंध आणि त्यांच्या काही अफलातून जाहिराती हे सारं (धोंगडेपुराण) इकडूनतिकडून, विशेषकरून त्यांना ओळखणाऱ्या माझ्या काही मित्रांकडून (माझ्या धाकट्या भावाकडून जास्त) नेहमी कानावर येत होतं. मीही बोलण्याच्या ओघात ते जयराज साळगावकरांना सांगितलं आणि कडक उन्हाळ्याच्या एका दुपारी आम्ही दोघं लोखंडवाला संकुलामधील पत्ता शोधत श्रीकांत धोंगडे यांच्यासमोर स्थानापन्न झालो. त्यांच्याशी संवाद सुरू झाला नि नकळत अहो-जाहोचा औपचारिकपणा गळून गेला.

जाहिरातीचा व्यवसाय आणि त्यातूनही तो चित्रपट या माध्यमाशी निगडित, म्हणजे अमर्याद संधी. तरी त्यातली जीवघेणी स्पर्धा, पैशांची अनिश्चितता माणसाला कसाला लावते. हे सगळं सुरळीत जमून आल्यास लक्ष्मीचा भरपूर प्रसाद मिळतो. ज्यांना हे सगळं जमतं त्यांचे ‘व्हिला’ बघून, त्यांच्या गाड्यांचा, ऑफिसचा भपका बघून अवाक् व्हायला होतं. इथपर्यंत पोचणं सगळ्यांनाच शक्य होत नाही. श्रीकांतनं ते जिद्दीनं शक्य केलं आहे.

स्वत:च्या भूतकाळाबद्दल बोलणं श्रीकांतला फारसं आवडत नाही; रुचत नाही; बोलण्याच्या ओघात जरी त्याचा अनिवार्यपणे उल्लेख झाला तरी. अनेकजण अशा परिस्थितीतूनच मोठे झाले आहेत याची त्याला जाण आहे. अमूकच नोकरी करायची वा मोठेपणी धंदाच करायचा असं काही न ठरवता, जे येईल ते स्वीकारत श्रीकांतची वाटचाल त्याच्या अंगभूत कलागुणांमुळे नेहमी चढत्या कमानीची राहिली आहे.

चारचौघांसारखा मराठी माध्यमातून मॅट्रिक झालेल्या श्रीकांत धोंगडेला लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. हातही चांगला होता. कल्पनाशक्तीची नैसर्गिक देणगी होती. या अंगभूत गुणांचा विकास श्रीकांतनं प्रचंड कष्ट, चिकाटी व मेहनतीनं केला. माणूस मोठा झाला की त्याच्या कष्ट-मेहनतीबद्दल बरंच



श्रीकांत धोंगडे

(कल्पितही) बोललं जातं. श्रीकांतची कहाणी त्याला निश्चित अपवाद आहे.

श्रीकांतचं आयुष्य साध्या साध्या प्रसंगातून धंद्याच्या दृष्टीनं सुदृढ होत गेलं आहे. आज त्यावेळच्या घटना अगदी किरकोळ वाटत असल्या तरी या पदापर्यंत पोचायला त्या पायाचा दगड म्हणाव्या, इतक्या महत्त्वाच्या आहेत. जे जे घडलं ते जणू श्रीकांतकरता घडवलं गेलं असं वाटतं. अनेक किरकोळ संधी अशा होत्या की त्या नाकारल्या असत्या तरी काही बिघडणार नव्हतं, पण श्रीकांतनं त्यात हात घातला आणि त्यातूनच दुसरी संधी चालून आली. नंतर असा जणू क्रमच ठरून गेला.

पुण्याच्या चित्रशाळा प्रेसनं एक पुस्तक प्रसिद्ध केलं होतं. त्याच्या पाच हजार प्रती दुसऱ्या दिवशी बाजारात वितरणाकरता जाणार होत्या. त्या पुस्तकात छापलेल्या नकाशातील एक अक्षम्य चूक सुदैवानं कुणीतरी पाहिली. त्यातल्या नकाशात नेफाचा भाग चीनमध्ये दाखवला गेला होता आणि खरोखरीची गंभीर समस्या निर्माण झाली. योग्य नकाशाचं पान छापून, पहिलं त्या पुस्तकातून काढून नवीन जोडणं आणि तेही पाच हजार प्रतींना, एका रात्रीत, अशक्य होतं. बहुधा श्रीकांतच्या भाग्यरेषेची ही सुरुवात होती. शाळेच्या शेवटच्या वर्षाला असलेला श्रीकांत नोकरीच्या शोधात नेमका त्याचवेळी तिथे पोचायला, ती चर्चा अनायासे ऐकायला एकच गाठ पडली. चित्रकलेचा चांगला हात असल्यानं श्रीकांतनं पुढाकार घेऊन काळ्या शाईनं एक प्रत सुधारून दाखवली. नकाशा अगदी पाहिजे तसा झाला. परंतु पुढच्या पाच हजार प्रतींचा प्रश्न होता. तेव्हा ती जबाबदारीही अंगावर घेऊन, रात्रभर बसून, पहाटेला श्रीकांतनं सारी पुस्तकं वितरणाकरता सिद्ध केली! या स्वयंस्फूर्त मेहनतीनं चित्रशाळेची नामुष्की तर वाचलीच, शिवाय श्रीकांतचं वजनही वाढलं आणि असं पुढे घडतच राहिलं.

ओळखपाळख नसताना अनंत मानेंकडे श्रीकांत नोकरी मागायला, काहीतरी काम द्या म्हणून विनंती करायला गेला. चित्रपट जाहिरातीचा शून्य अनुभव असूनही अनंत मानेंनी त्यांच्या नवीन चित्रपटाची,

‘केला इशारा जाता जाता’ची, जाहिरात श्रीकांतची केवळ काही चित्रं पाहून करायला सांगितली. अनंत मानेंसारख्या आघाडीच्या दिग्दर्शकाचं काम ही सुवर्णसंधी होती. सारं कसब पणाला लावून श्रीकांतनं काही जाहिराती सादर केल्या आणि अनंत मानेंना त्या बेहद्द पसंत पडल्या. मराठी चित्रपटसृष्टीत श्रीकांत धोगडेनं रोवलेला हा पाय इतका सुदैवी होता, की हा चित्रपट हाऊसफुल्ल राहत रौप्यमहोत्सवापर्यंत पोचला.

प्रसंग साधेच, म्हटलं तर कामंही पठडीतलीच, मात्र श्रीकांतची वैयक्तिक पत वाढवणारी. त्यामुळे एकामागून एक मराठी चित्रपटाच्या जाहिरातींची, स्लाइड्सची कामं वाढू लागली. ती अजूनही अखंड चालूच आहेत. सचिन पिळगावकर, अशोक सराफ, भरत जाधव या आजच्या आघाडीच्या निर्मात्या-कलाकारांपासून लहानातल्या लहान साऱ्यांचंच जाहिरात केंद्र श्रीकांत झाला आहे. पूर्वी दाखवल्या जाणाऱ्या स्लाइड्स, पोस्टर्स, फोटोग्राफ्स आणि आजचे मल्टिप्लेक्स, भव्य पडद्यांवरील दिसणारे चमत्कार यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. जे काळाप्रमाणे या बदलाला सामोरे गेले नाहीत त्यांना अपयशानं ग्रासलं. श्रीकांतनं स्वत:मध्ये, तांत्रिक बाबींमध्ये आधुनिकीकरण आणलं. जुन्या साऱ्यांना सांभाळत नव्याचाही स्वीकार केला. त्याच्या प्रगतीच्या यशाचं हे गमक आहे.

त्याहीपेक्षा मला वाटतं, श्रीकांत धोंगडेच्या यशात महत्त्वाचा वाटा आहे तो अल्पसंतुष्ट वृत्तीच्या त्यागाचा. श्रीकांत आहे त्यावर संतुष्ट नाही. मराठीचा डंका घेऊन त्यानं आपलं कार्यक्षेत्र संकुचित ठेवलं नाही. आपल्या कलेला मराठी माणसांनी दाद दिली, कौतुक केलं, तर ते स्वाभाविकच आहे, पण आज हजार पट जास्त विस्तारलेल्या, देशा-परदेशात झेंडा रोवलेल्या बॉलिवूडच्या दारापाशीसुद्धा आपण जर पोचत नसू तर घरी स्वत:भोवतीच दिवे ओवाळ्यात काय मोठं आहे, असं त्याला नेहमी वाटे.

या अभिजात कलाकाराची नोंद बॉलिवूड किंवा हिंदी चित्रपटसृष्टीनंही घेतली. राजश्री चित्रपट निर्मिती संस्था आणि त्याचे मालक ताराचंद बडजात्या व त्यांच्या




साऱ्या कुटुंबियांचे श्रीकांतबरोबर उत्तम स्नेहबंध गेली पस्तीस वर्षे जुळलेले आहेत. माधुरी दीक्षितच्या ‘हम आपके है कौन?’ या विश्वविक्रमी चित्रपटापासून आजच्या बडजात्या कुटुंबाच्या पुढील पिढ्यांच्या चित्रपटांपर्यंत हे प्रेमाचं नातं भक्कम टिकून आहे.

एवढं सारं लिहूनही श्रीकांतचं मोठेपण कशात, धंद्याची व्याप्ती किती मोठी, वैयक्तिक संबंध कुठपर्यंत, हिंदी चित्रपट निर्मात्यांना या मराठी माणसाचं कौतुक का, एवढ्या धंद्याच्या राजकारणातही श्रीकांत टिकून राहण्याचं इंगित काय, हे सारं अनुत्तरितच राहतं आणि ते कळलं नाही तर काय कळलं?

चिकाटी-लिखोटी-हातोटी-सचोटी या गोष्टी श्रीकांतनं अंगी मुरवल्या आहेत. मुख्य म्हणजे आपला मेंदू व डोळे सतत तल्लख ठेवले आहेत. काही उदाहरणं श्रीकांत एवढा मोठा कसा झाला हे सांगण्यास पुरेशी आहेत. अर्थात, याचा अर्थ असा नाही की केवळ यामुळेच श्रीकांत चांगल्या उंचीपर्यंत पोचू शकला.

कोणतीही गोष्ट वेळेवर पोचवणं, सादर करणं याला धंद्यात जी किंमत आहे, ती वेळ टळून गेल्यावर फुकट देऊनही शून्य किमतीचीच आहे. ही सारी तत्त्वं, मुसळधार पावसातही, पुणे-मुंबई रोज प्रवास करून श्रीकांतनं पाळली. त्याचबरोबर जे पाहिजे ते त्वरित सादर करणं याला जी तल्लखता लागते, त्या तल्लखतेच्या कसाला अनेक ठिकाणी श्रीकांतला सामोरं जावं लागलं आहे. सुभाष घई या बड्या चित्रपट निर्मात्यानं एका मंगळवारी संध्याकाळी, ‘आजच्या आज मला जाहिरात करून पाहिजे’ असं श्रीकांतला सांगितलं. शुक्रवारी चित्रपट प्रदर्शित होणार होता व गुरुवारी, त्याकाळी सर्वतोमुखी असलेल्या ‘स्क्रीन’मध्ये छापण्यासाठी पूर्ण पानाची जाहिरात पाहिजे होती. आठवड्याचं कुतूहल म्हणून उघडल्या जाणाऱ्या पानावर ती छापली जाणार होती. स्क्रीनचे मॅनेजर मुकेश देसाई चित्रपटाचे सारे फोटो वगैरे घेऊन तिथे हजरच होते. सुभाष घईंकडे तयार असलेल्या कोणत्याही जाहिराती त्यांच्या पसंतीला उतरल्या नव्हत्या. चित्रपटाचा बोलबाला तर खूप झाला होता. श्रीकांतनं हे सगळं एका दिवसात करणं कसं अशक्य आहे हे परोपरीनं सांगूनही घई ऐकण्यासच तयार नव्हते. आणि वीज




चमकावी तसं श्रीकांतनं समोरचा मोठा कागद घेऊन, काळ्या पेननं जाड अक्षरांत तिथल्या तिथं एक जाहिरात केवळ दोन शब्दांत बनवली. "NO NEWS" हे खूप मोठ्या अक्षरांत आणि खाली थोड्या लहान आकारात "EXCEPT SUBHASH GHAI'S SAUDHAGAR." ती जाहिरात पाहताच-वाचताच सुभाष घईंनी श्रीकांतला अक्षरश: मिठीच मारली. शब्दांचं सामर्थ्य असं असतं. तो प्रसंग आठवला की श्रीकांत भावनाविवश होऊन जातो.

सुनील दत्त यांच्याकडेसुद्धा असाच आणीबाणीचा प्रसंग एकदा आला होता. त्यांच्या सचिवाचा श्रीकांतला फोन आला, ''दत्तसाहेब आपणांस आजच भेटू इच्छितात. शक्य असल्यास लगेच या.'' सुनील दत्त यांच्या चित्रपटाच्या संदर्भात काही काम असेल या समजुतीनं श्रीकांतनं जेव्हा यांच्या खोलीत प्रवेश केला तेव्हा निवडणुकीची पोस्टर्स, फोटो, झेंडे यांचंच तिथं राज्य होतं. सुनील दत्त स्वत: निवडणुकीला उभे होते. त्यांना त्यांचं, इंदिरा गांधींचा सहभाग असलेलं, आकर्षक, मोठं पोस्टर त्वरित करून पाहिजे होतं. राजकारण हा श्रीकांतचा विषय नाही. त्यामुळे काय शब्द वापरावे, काय वाक्यं लिहावी याचा विचार चालू असतानाच सुनील दत्त यांच्या 'मदर इंडिया' या चित्रपटाशी निगडित जाहिरात केल्यास समर्पक होईल असं त्याला वाटलं. भारताच्या




तिरंगी नकाशाच्या पार्श्वभूमीवर हास्यवदन इंदिराजींचा उभा मोठा फोटो आणि वर ठळक अक्षरांत लिहिलं -"Mother India Needs You." बस! केवळ या छोटेखानी वाक्यात सुनील दत्त आले, इंदिराजींचा मोठेपणा आला, मतं द्या हे आवाहनही आलं. साऱ्या प्रचाराचं सार इतक्या कमी शब्दांत, इतक्या प्रभावीपणे केलेली हीच एकमेव राजकीय जाहिरात होती. त्याची हजारो पोस्टर्स मुंबईत व इतरत्रही लागली. सुनील दत्त तर बेहद्द खूष झालेच, शिवाय, रस्तोरस्ती पोस्टरपाठीमागे दडलेला श्रीकांतही.

या प्रकारच्या, प्रसंगानुरूप अफलातून, जगावेगळ्या जाहिराती ही श्रीकांतची खासियत आहे. केवळ अशा जाहिरातींचे संकलन केल्यास एक आगळंवेगळं पुस्तक होऊ शकेल.

चित्रपट निर्मात्यांनंतर ज्वेलर्सचा व्यवसाय देशापरदेशांत मोठ्या स्थानावर आहे. त्यातही भारतातीलच नाही तर जागतिक कीर्तीच्या अनेकांची कामं करण्यात श्रीकांतचे साथी सध्या मग्न आहेत. RPS Jewellers, URGE या इंग्लंडमधील, जपानची Gray, अमेरिकेची Paramont या साऱ्यांच्या आभूषणांचे कॅटलॉग्ज बनवणं, वेगवेगळी मॉडेल्स घेऊन कॅलेंडर्स बनवणं, ही सारी वेगळी क्षितिजं श्रीकांत आपल्या अद्ययावत स्टुडिओतून विस्तारित आहे.

सदैव झगमगाट असलेलं बॉलिवूड असो वा डोळे दिपवणारी आभूषणांची विक्रीकेंद्रं असोत, आपला मराठमोळा श्रीकांत, त्या साऱ्यांमध्ये स्वत:च्या पद्धतीनं आरामात वावरतो आहे. स्टुडिओत लपलेला त्याचा हा चेहरा, पुढे न येताच मराठी तरुणांना खूप काही सांगून जातो, शिकवून जातो.

---

**कुमार नवाथे**
साईप्रसाद, ६वा मजला,दयाळदास रोड,
विलेपार्ले (पू), मुंबई - ४०० ०५७.
kumar.nawathe@hotmail.com

# ललिताजींच्या आठवणी

## अरुण पुराणिक

''मी माहेरची ललिता देऊळकर. माझा जन्म १९२५ मध्ये ललिता पंचमीला झाला. बाबांनी कौतुकाने माझे नाव ललिता ठेवले. आम्ही फ्रेंचब्रिजजवळील हाजी कासम वाडीत राहत होतो. बरीच सारस्वत कुटुंबे शेजारी होती. चाळीला चिकटून रेल्वे लाईन होती. गाडी धडधडत जाऊ लागली की टेबलावरील कपबश्या, फळीवरील बरण्या खाली पडून फुटत असत.'' ललिता फडके लहानपणीच्या आठवणी सांगत होत्या.

''लहानपणापासून मला गाण्यांची खूप आवड होती. शाळेचा अभ्यास करताना मी जोरजोरात कविता म्हणत असे व अधेमध्ये अमीरबाईची गाणी गात असे. चरित्र अभिनेते हरिन्द्रनाथ चटोपाध्याय आमचे शेजारी, ते माझे गाणे ऐकत असत. वडील सतत आजारी असल्याने घरची आर्थिक परिस्थिती तशी बिकटच होती. चटोपाध्यायना याची जाणीव होती. एक दिवस ते माझ्या वडिलांना म्हणाले, 'साक्षांत लक्ष्मी तुमच्या घरात असताना कसली काळजी करता? तिला प्लेबॅक सिंगर बनवा आणि मग पाहा!' वडिलांच्या मनाची तयारी होत नव्हती. ते नको नको म्हणत होते. तरीही हरिन्द्रनाथ मला बॉम्बे टॉकिजमध्ये घेऊन गेले. तिथे हिमांशू रॉय व संगीत निर्देशिका सरस्वतीदेवींना त्यांनी माझे गाणे ऐकविले. त्यावेळी मी जेमतेम नऊ वर्षांची होते. दिसायला सर्वसाधारण व बारीक शरीरयष्टी! सरस्वती देवींना प्रश्न पडला इतक्या लहान मुलीला पार्श्वगायिका म्हणून कशी संधी द्यायची? माझा आवाज तर त्यांना आवडला होता. त्यांनी मला जाहिरात विभागात घेतले. त्याकाळी डालडा, हमाम, ५०१ साबण व सिगारेटीच्या वेगवेगळ्या भाषांतील जाहिराती, मुख्य सिनेमा सुरू होण्याआधी सिनेमागृहातून प्रसारित होत असत. त्यांचे शब्द निराळे असले तरी चाल एकच असे. त्यांनी या सर्व जाहिराती माझ्या आवाजात करून घेण्यास सुरुवात केली. वयाच्या मानाने तिथे मला खूप पगार मिळत होता.

पुढे शिकायला वेळच नव्हता. घरी मास्तर ठेवून मी हिन्दी व इंग्रजी शिकू लागले. विभुती मित्राच्या 'अंगुठी'मध्ये मला पार्श्वगायनाची संधी मिळाली. श्रीधर पार्सेकरांचा संगीत ऑपेरा होता. त्यामध्ये मी, शांता आपटे, राम मराठे व बाबुजी म्हणजे सुधीर फडके काम करत होतो. बहुधा १९४५ साल असावे. तिथेच बाबुजींनी मला प्रथम पाहिले. रुक्मिणी स्वयंवर (१९४६) मध्ये पार्श्वगायन करण्याची संधी मला बाबुजींनीच दिली. त्यातील गाणी बऱ्यापैकी लोकप्रिय झाली होती. पुढच्याच वर्षी संगीतकार शंकरराव व्यासांनी प्रकाशच्या 'भक्त ध्रुव'साठी माझ्याकडून तब्बल सात गाणी गाऊन घेतली. 'मन्दिर सूंना दीप बिन' आणि 'भजन के दिन दो चार रे' ही गाणी श्रोत्यांना आजही आठवत असतील.



ललिता फडके

अरुण, माणसाच्या स्वभावाप्रमाणे त्याचे गाणे असते. शंकरराव म्हणजे धार्मिकवृत्तीचा, अत्यंत साधा संगीतकार! त्यांना कधी कुणावर रागावणे माहीत नव्हते. त्यांच्याकडे मी गुजराती डबिंगही करत होते.

बॉम्बे टॉकिजमध्ये सी. रामचंद्र येत असत. तिथेच आमची ओळख झाली. ते मला म्हणाले, 'हे बंगाली फक्त बंगाल्यांनाच चान्स देतात. तुम्ही चांगल्या गाता, माझी गाणी गा. मी मागाल ते पैसे देतो.' मी त्यांना गमतीने म्हणाले, 'ती नवीन पोरगी गीता रॉयही सुरेख गाते (आणि खरेच ती चांगली गायची) तिला घ्या!' तेव्हा ते उसळून म्हणाले, 'मुझे नहीं चाहिए ऐसी लड़की।' माणूस फटकळ होता. तोंडात शिव्याही खूप असत. त्यामुळे कलाकार काही वेळा दुखावले जात. सिनेमाक्षेत्रात असून कधीही कोणत्याही स्त्रीच्या अंगाला हात न लावणारा माणूस! त्यांची गाणीही त्यांच्या स्वभावाप्रमाणे मस्त असायची.

त्यांनी 'साजन'मधील गाण्यांसाठी मला फिल्मिस्तानमध्ये बोलाविले. गाण्यांचे ध्वनिमुद्रण चालू होते. रफी शेरवानी, कुडता घालून आले होते. अतिशय मृदू स्वभावाचा शांत माणूस. मला ते म्हणाले, 'बहनजी, मैं नया हूँ. अगर कुछ गलती होगी तो मुझे माफ करना.' मी म्हणाले, 'आप तो मुस्लिम है. आप की हिन्दी भी अच्छी है, आवाज भी अच्छी है, बिलकुल डरना नहीं.' रफी पुढच्या काळात महान पार्श्वगायक बनले.

आपल्या पार्श्वगायनाच्या सुरुवातीच्या काळात रफीला, ज्यांचे मार्गदर्शन लाभले त्यांच्याविषयी बोलताना तो ललिताजींचे नाव आदराने घ्यायचा.

**ललिताजी आणि सुधीर फडके**



''दिलीप कुमार कुठेही भेटला की नमस्तेजी म्हणायचा. कामिनी कौशल नेहमी तोऱ्यात असायची. अमीरबाई मात्र माझी आवडती गायिका होती. एकदा, बारीक सडपातळ परंतु चुणचुणीत दिसणारी एक मुलगी समोरून गेली. सी.रामचंद्रनी तिला बोलावून घेतले. लताची -माझी ओळख अशी फिल्मिस्तानमध्येच झाली. बर्मनदादा (एस.डी.) सतत पान तोंडात ठेवून बोलत.

ललिताजी, 'अंगुठी' (१९४३) चित्रपटात सर्वप्रथम पार्श्वगायिका बनल्या परंतु गायिका म्हणून खऱ्या अर्थाने त्या लोकप्रिय झाल्या त्या 'साजन'मधील त्यांनी गायिलेल्या एका लोकप्रिय गाण्याने,

'आ गए चोर, चोऽऽर चोऽऽर
चोर आ गए नगरिया हमार,
ननद जरा जागना, बहन जरा जागना....'

ललिताजींनी ती घाबरगुंडी तो थरकाप आपल्या आवाजातून व्यक्त केला आहे. या गाण्यातील कर्णप्रिय ऱ्हिदम तर नकळत आपणांस नृत्य करण्यास प्रवृत्त करतो.

अलिकडच्या 'हम पांच' या दूरदर्शन मालिकेत हे गीत पार्श्वसंगीत म्हणून घेतले होते.

'साजन'मुळे ललिताजींची लोकप्रियता वाढली. याच दरम्यान त्यांचे 'नमक', 'उठो जागो', 'जलन', 'खिडकी', 'मेरा मुन्ना' हे चित्रपट प्रदर्शित झाले. तर 'नदिया के पार'ने त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले.

कोळी जीवनाची पार्श्वभूमी असलेल्या 'नदिया के पार' (१९४८)चे लेखक, निर्देशक होते किशोर साहू. त्या जीवनाला वास्तव स्वरूप देण्यासाठी त्यांनी चित्रपटातील संवादात व गाण्यात छत्तीसगढी भाषेचा उपयोग केला होता. ते स्वत: मूळचे छत्तीसगढचे राहणारे होते. 'कठवा के नैय्या बनइहे रे मलहवा', 'दिल काहू को देव ना' अशी छत्तीसगढी बोलीभाषेतील गाणी ऐकताना एक वेगळेपण जाणवते. सी.रामचंद्र व ललिताजींनी त्या भाषेचा ढंग अचूक पकडून त्या शैलीने यातील गाणी गायली आहेत. त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे अपुरे आहे. एखाद्या स्त्रीचे (फेमिनाइन) गाणे कसे असावे. याचा ललिताजी म्हणजे आदर्श होता. 'मोरे राज्जा होऽऽ' अशी लडिवाळपणे सख्याला साद घालावी ती ललिताजींनीच!

त्यांची गाणी ऐकताना त्या कधी रेहाना, तर कधी कामिनी कौशल, कधी हंसा वाडकर तर कधी बेबी शकुंतला वाटत. सुरुवातीला त्यांची हिन्दी गाणी ऐकताना माझी ठाम कल्पना झाली होती की या इंदूरकडच्या असाव्यात!

''अरे, माझे हिन्दी उच्चार चांगले आहेत असे तुला वाटते. मी तुला शहीद (१९४८)च्या वेळचा किस्सा सांगते. शहीदचे संगीतकार लाहोरचे गुलाम हैदर होते. त्यांचे 'बचपन की याद धीरे-धीरे प्यार बन गई' गाणे मी गायले. त्यांना माझे उच्चार चक्क मराठी स्टाईल वाटले. म्हणून बाकी गाण्यांसाठी त्यांनी सुरिन्दर कौर म्हणून दुसरी पंजाबी गायिका शोधली.''

''सचिनदेव बर्मननी मला 'आठ दिन'(१९४६)मध्ये संधी दिली होती. १९४८मध्ये 'विद्या'साठी त्यांनी मला बोलाविले. एचएमव्हीमध्ये रेकॉर्डिंग होते. त्याकाळी मेणाच्या तबकड्यांवर (रेकॉर्ड) ध्वनिमुद्रण होत असे. माडगावकर रेकॉर्डिस्ट होते. सुरय्याही तिथे आली होती. ती म्हणाली, 'मला घाई आहे. माझ्या रेकॉर्ड आधी करा.' मी वाट पाहत बाहेर बसले. बर्मन दहा मेणाच्या तबकड्या घेऊन आले होते. सुरय्याने फक्त एका गाण्यासाठी सहा तास घेतले व आठ रेकॉर्ड फुकट घालविल्या. नवव्या रेकॉर्डला गाणे ओके झाले. आता शेवटची एकच रेकॉर्ड शिल्लक होती. माझे गाणे फायनल रिहर्सलनंतर पहिल्याच टेकमध्ये ओके झाले. माडगावकर म्हणाले,'ललिता मराठी माणसाची तू आज शान राखलीस!' खडीसाखर द्या, लवंग द्या. असा नखरा मी कधीच केला नाही, ना कधी कुणाला त्रास दिला. १९४८-४९ मध्ये, माझे रामबान (शंकरराव व्यास), बेदर्द (रामप्रसाद), दौलत (हनुमान प्रसाद), गर्ल्स स्कूल (सी.रामचंद्र), नरसिंह अवतार (वसंत देसाई), खामोश सिपाही (हंसराज बहल), जय भीम (सुधीर फडके) हे चित्रपट प्रदर्शित झाले. त्याकाळी इतकी गाणी गात असे की, माझ्या टॉन्सिल्सना चक्क सूज आली होती. उत्तरा-अभिमन्यू विवाहावर आधारित मराठी-हिन्दीमध्ये प्रदर्शित झालेला आमचा 'माया बाजार' चित्रपट

त्या काळी खूप गाजला. या चित्रपटाच्या वेळी माझा व बाबुजींचा विवाह झाला.

१९४९च्या दरम्यान सुधीर फडके यांच्याशी माझा विवाह झाला आणि आम्ही पुण्याला स्थायिक झालो. रफी आमच्या लग्नाला आला होता. इतकेच नव्हे, तर तो मंगलाष्टकाही गायला! आता ध्वनिमुद्रणासाठी पुण्याहून सारखे मुंबईला येणे शक्य नव्हते. माझे गाणे बंद झाले. मी जाताना,'आप जा रही हो? हमारा कितना नुकसान होगा आप को पता है?' असे बर्मन म्हणाले.''

फिल्मिस्तानच्या सरगमसाठी (१९५०) सी. रामचंद्रनी खास पुण्याहून मला बोलावून घेतले. त्यातील 'तिनक तिन तानी' गीत मी व लताने गायले होते. फक्त एच.एम.व्ही.मध्ये जाऊन रेकॉर्डिंग करणे बाकी होते. त्या दिवशी मुंबईत खूप पाऊस पडला होता. लता त्यावेळी नाना चौकात राहत असे. तिथे तर तळे साचले होते. मी वेळेवर स्टुडिओत पोचले. परंतु सी.रामचंद्र व लता या दोघांचाही पत्ता नव्हता. आठ तास मी तिथे नुसती बसून त्यांची वाट पाहत होते. त्यातच मला आठवा महिना लागला होता. मला तिथे बसवेना, तेव्हा मी घरी निघून आले. मी गेल्यावर चितळकर आले व त्यांनी सरस्वती राणे व लताला घेऊन ते गाणे रेकॉर्ड केले. मी त्यांना 'काय झाले?' म्हणून विचारले. तर ते हसत-हसत म्हणाले, 'सर्वत्र पाणी साचले होते. मग काय करणार? मस्तपैकी पावसाची मजा लुटली.'

''ललिताजी, आपल्या दीर्घ आयुष्यातील सर्वांत सुखद प्रसंग कोणता?'' या प्रश्नावर त्या सांगतात,

''श्रीला लहानपणापासून गाण्याची आवड होती. थोडासा दूर, पडद्यामागे उभा राहून, मन लावून तो बाबुजींची गाणी ऐकत असे. बाबुजींच्या ते लक्षात आले. त्याला जवळ घेऊन बाबुजी म्हणाले, 'श्रीधर, आधी भरपूर अभ्यास कर. खूप शिकून मोठा हो. गाणे तर आपल्या घरातच आहे.' श्रीधरची 'फिटे अंधाराचे जाळे'(१९८१), 'ओंकारस्वरूपा सद्गुरू समर्था' (१९८६) ही गाणी आम्ही जेव्हा ऐकली तेव्हा मी व बाबुजी सर्वार्थाने तृप्त झालो. जीवन सार्थकी लागल्याची जाणीव झाली.''

''बाबुजी गेल्यापासून माझी कशातच इच्छा राहिलेली नाही. परंतु श्रीधर आणि बाबुजींचे स्वर कानी पडले असता मनाला एक शांती मिळते. आता फक्त तोच एक विरंगुळा राहिला आहे.''

ललिताबाई गेल्या... जुन्या पिढीतील संगीताचा एक दुवा निखळला. आजही साठ वर्षांपूर्वीचे त्यांचे गाणे मनात रुंजते,

'हमको तुम्हारा ही आसरा, तुम हमारे हो न हो.....'

---

**अरुण पुराणिक**
मोबाइल- ९३२२२१८६५३

## विजय शं. माळींच्या ÷कऱ्हाड' पुस्तकाला पुरस्कार

'कऱ्हाड : प्रीतिसंगमावरचं आदितीर्थ' या पुस्तकाला 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा विशेष ग्रंथ पुरस्कार' जाहीर झाला आहे. २५ मे २०१० रोजी, शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे एका शानदार समारंभात त्याचे वितरण झाले. ज्येष्ठ लेखिका गिरिजा कीर यांच्या हस्ते सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ लेखक 'उपरा'कार लक्ष्मण माने, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकुमार नलगे, साहित्य सभा अध्यक्ष विजय चोरमारे, उपाध्यक्ष प्रा. एकनाथ पाटील इत्यादी मंडळी व्यासपीठावर उपस्थित होती. 'लेखकाने कऱ्हाडची उत्कृष्ट 'ऑटोबायोग्राफी' लिहिली आहे' असे गौरवोद्गार साहित्य सभा अध्यक्षांनी काढले. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथभेट व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते.




**मूल्य : १०० रुपये**

**सवलतीत : ६० रुपये**

# लक्ष्मण माने यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त प्रसिद्ध पुस्तके

## सम्यक् परिवर्तन

संपादन : **डॉ. यशवंत मनोहर, डॉ. रावसाहेब कसबे**




सम्यक् परिवर्तन' हे मुख्य आशयसूत्र घेऊन, त्यानिमित्ताने आपल्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमधील आजवरच्या परिवर्तनाच्या मागोवा घ्यावा; सम्यक् परिवर्तनापुढील नवी आव्हाने अधोरेखित करावी आणि परिवर्तनाला गती प्राप्त होण्यासाठी आवश्यक त्या उपायांची चर्चा करावी असे आम्हाला वाटले.

सम्यक् परिवर्तन म्हणजे योग्य किंवा सर्व कल्याणाच्या दिशेने होणारे परिवर्तन! परिवर्तनविरोध हा जीवनद्रोह आहे. हे सर्व वंचितांनी लक्षात घ्यावे; आपल्यावर गुलामी लादणाऱ्या सर्व शोषक संस्कारांना लाथाडावे आणि सम्यक् परिवर्तनाच्या प्रकाशवाटेवर स्वतःला आणून उभे करावे. भारताचे संविधान आपल्या बाजूने, सम्यक् परिवर्तनाचा उद्घोष करीत उभे आहे. हे सर्व वंचितांना कळावे, त्यांनी भयमुक्त व्हावे आणि आपल्या ज्वलंत माणुसकीची प्रस्थापना करायला सुरुवात करावी अशी या ग्रंथाची मनापासून इच्छा आहे. (प्रस्तावनेमधून)

**मूल्य २०० रुपये; सवलतीत १२० रुपये**

## रेषेपलीकडील लक्ष्मण

संपादन : **डॉ. यशवंत मनोहर, डॉ. रावसाहेब कसबे**

भटक्या-विमुक्तांच्या उत्थानासाठी देहभान हरपून, झोकून काम करत, या समाजात आत्मसन्मान निर्माण करण्याचं काम लक्ष्मण मानेंनी केलं. त्यासाठी लेखणी चालवली, घणाघाती विचार मांडले. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, संशोधन केंद्रे काढली. हा 'उपरा' ४२ जमातींचा 'आपला' झाला. बाबासाहेबांच्या वाटेने जात धम्मदीक्षा घेऊन माणूसपणाच्या वाटेवर निघालेल्या या अवलियानं समाजावर आपला अमिट ठसा उमटवला.

एक सर्वसामान्य मुलगा स्वतःच्या कर्तबगारीनं लेखक, विचारवंत, कलावंत, गुणवंत, साहित्यअकादमी ते पद्मश्रीसारखे पुरस्कार घेणारा कार्यकर्ता, प्रेमळ-वत्सल पती, पिता आणि एक चांगला माणूस कसा बनतो याचं उत्तम उदाहरणं म्हणजे लक्ष्मण माने. या व्यक्तीला शब्दांत बांधणं तसं कठीणच, तरी त्यांच्या सहवासात आलेल्या विविध स्तरांतील व्यक्तींच्या अनुभवातून त्यांचा वेध घेण्याचा हा प्रयत्न.




**मूल्य २०० रुपये; सवलतीत १२० रुपये**

# प्रशासकीय मराठी

## नीला सत्यनारायण

महाराष्ट्रदिनाच्या शुभमुहूर्तावर, १ मे १९६० रोजी, शासनव्यवहारात मराठीचा वापर सुरू झाला. महाराष्ट्राचा राज्यकारभार मराठीतून करण्यात यावा अशी घोषणा महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळीच तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केली होती. इंग्रजीऐवजी मराठीचा वापर करायचा म्हणजे जय्यत तयारी करण्याची आवश्यकता होती. ही गरज भागवण्यासाठी भाषा संचालनालय, भाषा सल्लागार मंडळ आणि काही भाषातज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्रकाशने प्रसिद्ध करण्यात आली. प्रशासनिक लेखन, प्रशासन वाक्यप्रयोग, शासन व्यवहारकोश अशी काही महत्त्वाची प्रकाशने शासनात काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या सोयीसाठी तयार करण्यात आली.

शासकीय पत्रव्यवहार, फाईलवरच्या टिपण्या, शासननिर्णय, विविध परिपत्रके, प्रसिद्धीपत्रके इत्यादींचे निवडक नमुने संकलित करण्यात आले. व्यवहारात आपण नेहमी जी मराठी भाषा बोलतो त्यापेक्षा शासकीय मराठी भाषा मात्र भिन्न असल्याचे जाणवते. अजूनही अधिकारी आणि कर्मचारी एकमेकांशी बोलताना इंग्रजीचाच आधार घेताना आढळतात. ''नोट पुटअप करा, ड्रॉफ्ट ॲप्रुव्ह झाला का? ओसी, एफसी सिग्नेचरसाठी पाठवा, लेटर इश्यू करा, लेट मस्टर कुठे आहे?'' असे असंख्य इंग्रजी शब्द सगळ्यांकडून सर्रास वापरले जातात. बोलताना सातत्याने इंग्रजीचा आधार घेतला जातो. लिहिताना मात्र मराठी भाषेचे स्वरूप इतके क्लिष्ट करण्यात आले आहे की मराठी जाणणाऱ्यांनासुद्धा कित्येकदा प्रशासकीय मराठी वाचताना ही आपलीच भाषा आहे का असा संभ्रम होतो!

काळाबरोबर क्रमाने भाषाही आपला चेहरामोहरा बदलत राहते; मात्र भाषेची एकंदर बैठक आणि परंपरा तशीच राहते. वेगवेगळ्या भाषांतून आलेले अनेक शब्द मराठी भाषेत सामावत गेले आहेत. संस्कृत ही सर्व भाषांची गंगोत्री असल्यामुळे त्यातून कैक शब्द घेऊन नवीन शब्दप्रयोग रूढ केले गेले. असे करताना मराठी भाषा सुलभ होण्याऐवजी कठीण व क्लिष्ट होत गेली हे वास्तव आहे. शासकीय लेखनामध्ये इंग्रजीतून विचार करून त्याचे मराठीकरण केलेले स्पष्ट जाणवते. आपली शासनयंत्रणा पुष्कळअंशी ब्रिटिशकालीन आहे. प्रशासकीय मराठीचा मूळ उद्देश सोप्या आणि सुलभ भाषेमध्ये शासनाचे निर्णय सर्वसामान्य जनतेला कळावेत असा होता.

नागरिकांकडून शासनाकडे येणारी पत्रे आणि शासनाकडून नागरिकांना देण्यात येणारी उत्तरे यांची उभयपक्षी मोठी देवाणघेवाण चालू असते. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला कळेल अशीच भाषा शासनाने वापरली पाहिजे. इतिहासकाळातल्या शासनपत्र व्यवहारात शासकीय अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या अर्जात 'मेहेरबान मामलेदार साहेब यांचे हुजुरास' असे मायने सर्रास आढळून येतात. पत्राच्या शेवटी 'आपला नम्र सेवक' असा मजकूर हमखास असायचा. अशी भाषा आताच्या लोकशाही कारभाराशी विसंगत असल्यामुळे बदलणे गरजेचे होतेच. आजच्या शासनप्रणालीत उच्चनीचतेच्या भावनेस वाव नाही. सगळेच जनसेवक आहेत अशी भावना असल्यामुळे त्यानुसार प्रशासकीय मराठीचे स्वरूप बदलत गेले. मात्र इंग्रजीची जातकुळी आपल्याला विसरता विसरत नाही हे तितकेच खरे. त्यामुळेच प्रशासकीय मराठीत फार क्लिष्टता आली आहे. मराठी भाषा ही मुळातच इंग्रजी भाषेसारखी अदब, पोशाखीपणा आणि झिलई लावलेली नाही. एका शाहिराने वर्णन केल्याप्रमाणे मराठीची जडणघडण कडकडीत आहे. त्यामुळे इंग्रजीचे भाषांतर करून मराठी लिहिण्यापेक्षा सरळ मराठी लिहिली तर ती जास्त जवळची वाटते. "Government is pleased to direct that..." अनेक शासकीय पत्रांची सुरुवात अशी असते. याचा मराठीत अनुवाद करताना सरळ 'शासन असे निदेश देते की' एवढे म्हटले तरी पुरे होते. 'The undersigned presents compliments' अशा मजकुराने सुरुवात होणारी ज्ञापने मराठीत करताना सरळ अमुक अमुक यांच्या आदेशानुसार असे कळविण्यात येते की एवढे म्हटले तरी पुरे होते. प्रत्यक्षात मात्र तसे घडताना दिसत नाही. इंग्रजी भाषेचा अनुवाद करता करता शब्दांचा फाफटपसारा सरळ साध्या मराठीला बिघडवून टाकतो. 'कृपया याची पोच दिली जावी' असे म्हणण्यापेक्षा 'पोच द्यावी' हे सोपे नाही काय? 'आपणाशी अधिक पत्रव्यवहार केला जाईल' असे म्हणण्याऐवजी 'आपणास याबाबत पुन्हा कळवण्यात येईल' किंवा 'जिल्हाधिकाऱ्यांकडून असे कळवण्यात आले आहे की' याऐवजी 'जिल्हाधिकारी असे कळवतात की' असे लिहिल्याने मराठी भाषा अकृत्रिम वाटते. परंतु दुर्दैवाने तसे लिहिले जात नाही. सोप्या व थेट मराठीपेक्षा इंग्रजीचा अनुवाद केलेली, अवघडलेली मराठीच शासनात वापरली जाते असे दिसून येते.

इतर भाषांतून आलेले बरेचसे शब्द मराठीत इतके प्रचलित झाले आहेत की त्यांना पर्यायी शब्द शोधणे अवघड झाले आहे. तसे ते आवश्यकही नाही. पोलिस, टेबल, स्टॅम्प इत्यादींसारखे शब्द सर्वसामान्य जनतेलाही कळतात. त्यामुळे या शब्दांना क्लिष्ट पर्याय काढून मराठी भाषा बिघडवण्याची गरज

नाही. छत्रमार्ग, उद्वहन, निरसित यांच्यासारखे बोजड शब्द समजून घ्यायला अधिकाऱ्यांनाच आटापिटा करावा लागतो. आपण बोलीभाषेत जसे बोलतो तसे शब्द वापरून शासनाचा आदेश सोप्या शब्दांत कळवला जाऊ शकतो. मात्र आपण शब्दकोशाच्यासुद्धा इतके आहारी गेलो आहोत की ज्यांच्यासाठी आपण हे शब्दप्रयोग करतो त्यांना त्याचा अर्थ कळो वा न कळो, प्रशसाकीय मराठीचा घोडा आपण दौडवतच राहतो.

माझ्या ३७ वर्षांच्या शासकीय सेवेत प्रशासकीय लेखनाशी माझी गट्टी कधी जमलीच नाही. अनेकदा कनिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांनी लिहिलेल्या टिप्पणीचा अर्थ किंवा टिप्पणीतील शब्दांचा अर्थ मला विचारावा लागायचा. बऱ्याच वेळा हाताखालच्या लोकांनाही त्या शब्दांचा नेमका अर्थ माहीत नसायचा. अशा वेळेला त्या जागी अमराठी अधिकारी असेल तर त्यांची भंबेरीच उडते.

कित्येकदा समजुतींच्या गफलतींमुळे भलतेच शब्दही वापरले जातात. एकदा आमचे एक वरिष्ठ अधिकारी मला म्हणाले होते, ''तुमच्या जंतूकडून अहवाल मागवून घे.'' मला त्यांच्या बोलण्याचा काहीच अर्थबोध न झाल्यामुळे मी त्यांना त्यांच्या आदेशाचा अर्थ विचारला. ते उपहासाने हसले आणि म्हणाले, ''तू मराठी मदरटंगवाली असून जंतूचा अर्थ कळत नाही? जंतू म्हणजे कनिष्ठ अधिकारी.'' ते ऐकून मला मनसोक्त हसू आले. ते माझे वरिष्ठ असल्यामुळे मला माझे हसणे लपवावे लागले. या अधिकाऱ्याने संस्कृत, तमिळ आणि मराठी यांची सांगड घालून स्वत:च हा शब्द बनवला होता, हे मला नंतर समजले.

मुळात प्रशासकीय मराठी ही जनसामान्यांना समजावी अशा उद्देशाने शासनाने स्वीकारली. परंतु आज पन्नास वर्षे झाल्यानंतरही प्रशासकीय मराठी क्लिष्ट व जनसामान्यांना न पेलणारी अशीच राहिली आहे हे आपले दुर्दैव आहे.

मराठीला स्वत:ची राजभाषेची जबाबदारी सक्षमतेने पार पाडता यावी आणि प्रशासन क्षेत्रातील परिवर्तन सहजतेने घडून यावे या हेतूने पदनामकोश नावाचा एक ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. इंग्रजी संज्ञांना पर्याय देणारा हा ग्रंथ होता. लोकजीवनाशी समकक्ष आणि तरीही मराठीच्या सध्याच्या शब्दभांडारात भर टाकण्याच्या दृष्टीने, विविध विषयांतील प्रमाणित परिभाषा ठरवण्यासाठी, मुद्दाम एक आयोग नेमून, तज्ज्ञांच्या देखरेखीखाली या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली. त्याच्यापाठोपाठ तीस हजार शब्दसंख्या असलेल्या शासन व्यवहार कोश हा ग्रंथ निर्माण करण्यात आला. मराठीच्या प्रशासनिक विकासाचा हा एक महत्त्वाचा टप्पा होता. मात्र पदनामकोशाला बदनामकोश असेच नाव पडले. शब्दांचा अपरिचितपणा त्यांच्या वापराने अथवा सरावाने दूर होईल असा विचार करून या ग्रंथात नवनवीन शब्द घेण्यात आले. परंतु त्या पर्यायी शब्दांवर भरपूर टीका झाली. नव्याने घातलेले शब्द फारसे रुचकर झाले नाहीत अशीच या ग्रंथाबाबत लोकांची भावना झाली.

मी एक स्त्री अधिकारी असल्यामुळे पत्राच्या शेवटी आपली विश्वासू किंवा आपली स्नेहांकित लिहिण्याऐवजी आपली स्नेहांकिता असे मी लिहू लागले. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी नेमका तो शब्द पकडला व त्यावर 'हा नवा शब्द फार भावला' असा अभिप्रायही दिला. अशा तऱ्हेने काही नवीन शब्द रुजूनही जातात पण त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे.

इंग्रजीला पर्यायी मराठी शब्द शोधणे हे जसे शासनापुढचे एक आव्हान होते तसेच मराठीतील मसुदालेखन हेही होते. इंग्रजीतून मराठीत स्थित्यंतर करताना शासनातील अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी स्वत:ची एक गूढ शैली निर्माण केली व ती प्रचलितही झाली. या प्रकारात मराठीची भाषा म्हणून अडचण नव्हती. जो मसुदा अथवा टिप्पणी लिहिली जाते ती अशा शब्दात असते की जिचा अर्थ आपण लावू तसा लागतो. ही पण एक कला आहे, जी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोकरीमध्ये रुजू झाल्यावर आपोआप आत्मसात करता येते.

संदिग्ध भाषेत टिप्पणी केल्यावर शेवटाला 'करावे किंवा कसे?' असे लिहिण्याचा प्रघात आहे. त्याचा अर्थ शेवटची सही करणाऱ्याने या निर्णयाची जबाबदारी घ्यावी असा असतो. लिहिणाऱ्याचे स्वत:चे काहीच मत नसते असेच यात अभिप्रेत असते. बऱ्याचदा शासनाकडून केला गेलेला पत्रव्यवहार जनसामान्यांच्या गळी उतरतच नाही. कित्येक वेळेला शासनाकडून आलेले आदेश घेऊन अनेक मंडळी माझ्याकडे त्या पत्रांचा अथवा आदेशांचा अर्थ विचारायला आलेली आहेत. मग आपल्याच लिखाणाचा नेमका अर्थ काय होतो हे ठरवण्यासाठी धावपळ सुरू होते. पाश्चात्य कवी ब्राऊनिंगने असे म्हटले होते, की ''मी जे लिहितो ते लिहिताना मला माहीत असते ते काय लिहिले आहे. नंतर मात्र ते वाचायचे झाल्यास ते फक्त परमेश्वरालाच वाचता येते.'' तसेच काहीसे शासकीय मराठी मसुद्यांचे असते. त्यातल्या विचित्र भाषेमुळे कधी लोकांच्या संतापाला सामोरे जावे लागते तर कधी यातून विनोदी प्रसंगही घडतात.

थोडक्यात काय, तर राजभाषा म्हणून गौरवलेली प्रशासकीय मराठी सामान्य माणसासाठी बनवली खरी. जनसामान्यांच्या बोलीभाषेशी जवळीक साधणारी ही भाषा आहे असेही सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र शासनाची बोली अजूनही सामान्य माणसाला समजलीच नाही असे वाटते. यंदा महाराष्ट्र राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा होत आहे. अर्थातच राजभाषा मराठीतूनच शासन या ऐतिहासिक उत्सवाचे संदेश व त्या निमित्ताने घोषित केलेल्या आपल्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोचवत आहे. पन्नास वर्षांत राजभाषेने आपल्या जनतेबरोबर कितपत संवाद साधला हे फक्त जनताच सांगू शकेल.

**नीला सत्यनारायण**
६०१, असीम सोसायटी,
जयवंत पालकर मार्ग, वरळी,
मुंबई - ४०० ०२५.

# वीजनिर्मिती, विजेचा तुटवडा व आपण

## श्रीकांत पेटकर

मुलांना शाळेला सुट्टी लागली की त्यांना मामा, काका, आजोबांच्या गावी जायचे वेध लागतात. मोठ्या माणसांनाही लग्न समारंभ, इतर गाठीभेटीचे कार्यक्रम असतातच. नेहमी नातेवाईकांकडून 'कधी गावाला येणार?' असा प्रश्न उत्सुकतेनं विचारला जायचा. मात्र यंदा या प्रश्नाऐवजी ''छोट्या सुरुलला घेऊन नका येऊ इकडे'' असा सल्ला देण्यात येत आहे. कारण?

कारण तिथलं महाभयंकर तापमान. रोजच ४६, ४७ अंश सेल्सिअस इतकं तापमान असल्यानं गावातील रस्ते ओस पडले आहेत. लग्नसमारंभ यावर्षी सगळे रात्रीला होत आहेत. शिवाय, पाण्याची टंचाई. आठवड्यातून एखाद वेळ नळाला पाणी येतं. मरणाचं ऊन. बाहेर फिरता येत नाही. अन् घरात बसावं तर वीज नाही. लोडशेडिंगमुळे १०-१०, १४-१४ तास वीज गुल. कूलर, पंखे, एसी, टी.व्ही., संगणक मग चालणार कसे? लहान मुलाला घेऊन इकडे येऊ नका, हाल होतील, त्यापेक्षा आम्हीच येतो मुंबईला; असं जेव्हा एका नातेवाईकाकडनं ऐकलं, तेव्हा मुंबई व महाराष्ट्राची मी तुलना करू लागलो, विजेच्या बाबतीत.

खरंच! मुंबईत राहून उर्वरित महाराष्ट्रातील माणसाचं दु:ख नाही जाणता येणार. मुंबईत मॉल्स् आणि चॅनल्सच्या विळख्यात सापडलेल्या जनतेला विजेचा प्रश्न जाणवायचा असेल तर मॉल्स् आणि चॅनल्सची वीज गायब करावी लागेल.

मुंबईची वा कुठचीही वीज बंद करायची असा अतिरेकी विचार थांबवून, महाराष्ट्रातील वीजनिर्मिती, विजेची मागणी, विजेचा पुरवठा याबाबतीत माहिती घेण्यासाठी www.mahageneco.com, www. statetransmissions unit, load dispatch centre इत्यादी साईट्स फिरून आलो अन् वस्तुस्थिती कळून आली.

महाराष्ट्रात पारंपरिक पद्धतीने वीजनिर्मिती होते ती मुख्यत्वे औष्णिक, जल वा आण्विक व गॅसच्या उपयोगानं. त्यात;

| | |
|---|---|
| औष्णिक | |
| विद्युतकेंद्राद्वारे | ६८०० मेगावॉट |
| जलविद्युत केंद्राद्वारे | २३४४ मेगावॉट |
| गॅसविद्युत केंद्राद्वारे | ८५२ मेगावॉट |
| **एकूण वीजनिर्मिती** | **९९९६ मेगावॅट** |

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला दररोज १,७३,२१,१५७ ग्राहकांना वीजपुरवठा करावा लागतो.

यावरून दिसून येतं की रोज सरासरी १५००० मेगावॉट मागणी असताना ९९९६ मेगावॉट इतकीच निर्मिती आहे. मागणी व पुरवठा यातील फरक भरून काढण्यासाठी सुरू होतं भारनियमन. मागणी व पुरवठा यातील फरक तसा वर्षभरच असतो म्हणून भारनियमन वर्षभर करावंच लागतं. जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या काळात शेतीसाठी पंप लावणं गरजेचं नसतं म्हणून भारनियमन थोड्या कमी प्रमाणात असतं. एकदा पावसाळा संपला की भारनियमनाचे बळी पडतात ते पहिल्यांदा शेतकरी. शेतकरीराजा...शेतकरीराजा... असा नावापुरता राजा असलेला शेतकरी आधीच आर्थिकदृष्ट्या पीडित असताना लोडशेडिंगमुळे शेतीही धड करू शकत नाही. आणि वीजमंडळ, सरकार, वीजकपात करून जणू वाकुल्या दाखवित म्हणतात, ''शेतकऱ्यांनो, करा आता शेती!''.

मधूनमधून शेतीसाठी वीज मोफत देण्याचा नारा देऊन स्वत:चा उदो उदो करणाऱ्यांना हेही माहीत असतंच की वीजच नाही, तर मोफत काय अन् विकत काय, तुम्ही वीज वापरूच शकणार नाही ते.

महाराष्ट्रातील सर्व निर्मिती आणि मागणी यांचं गणित काढलं. तर ७८८९ मेगावॉट इतकी विजेची उपलब्धता आहे. मागणी आहे १३१०० मेगावॉट त्यामुळे तुटवडा आहे ५२११ मेगावॉट.

मुंबईत २३७० मेगावॉट इतकी मागणी आहे. तुटवडा ४६२ मेगावॉट इतका आहे. मुंबईची गोष्टच वेगळी आहे. मुंबईला वीज देण्यासाठी Reliance, BEST, Tata आहेतच. आपण उर्वरित महाराष्ट्राची विजेची मागणी पुरवठा याबाबत बघू या!

अधिकृत माहितीनुसार २० मे रोजी १७.५१ वाजता Therasal + Gas + Hydro मध्ये सर्व मिळून वीजनिर्मिती ४९९२ मेगावॉट इतकी झालेली आहे. कित्येक विद्युतसंच बंद आहेत. औद्योगिक ६००० मेगावॉट + इतर वर्ग १५००० मेगावॉट इतकी मागणी असताना फक्त ५००० मेगावॉट इतकी निर्मिती, १६,००० मेगावॉट इतकी तूट, परिणामी, लोडशेडिंग!

त्यामुळे शेतकऱ्यांची वाट लावल्यानंतर खेड्यापाड्यातील गावकऱ्यांच्या मागे भारनियमनाचा ससेमिरा सुरू होतो. दहा-दहा, चौदा-चौदा तास वीज गायब. (एका परीने बरे होते...नाहीतर वीज असती की टी.व्ही.वर नाच-गाण्याचे कार्यक्रम बघण्याशिवाय तरुणमंडळी वा इतरही लोक काही करताना दिसत नाही. देशापुढे एकच उद्देश दिसतो. महागायक वा महाडान्सर शोधण्याचा!)

एखाद्या गावातील आमदार वा नेता वजनदार असला की तो आपल्या भागातील लोडशेडिंग तात्पुरती का होईना रद्द करून दुसऱ्या भागावर लादतो. हे तसं वर्षभर सुरू असतं. परंतु फेब्रुवारी, मार्च महिन्यांत ते अधिक जाणवतं. धरणातील पाण्याची पातळी खाली

जाऊ लागली की वीजनिर्मिती केंद्रांना बंधनं येऊ लागतात.

ही यावर्षीचीच स्थिती नाही तर गेल्या नऊ-दहा वर्षांपासून असंच सुरू आहे. एन्रॉन कंपनीच्या दाभोळ येथील प्रकल्पाला विरोध म्हणून मधील जी वर्षं वाया गेली त्या काळात वीजनिर्मितीची काहीच कामं झाली नाहीत. त्या काळात एन्रॉनसारखे नऊ-दहा प्रकल्प कार्यान्वित व्हायला हवे होते. पण..... राजकारण.

मतिमंद मुलीवर नराधमानं बलात्कार करावा. तिला कळू नये आपल्याला काय होतंय. नऊ महिन्यांनी मात्र ती आई होणार. मुलांचा सांभाळ करू शकणार आहे का ती? त्याचप्रमाणे दाभोळ, एन्रॉन या विषयावर सरकार, विरोधी पक्ष, इतर संघटना गदारोळांचा, आरोपांचा फक्त बलात्कार करत राहिले. या नऊ वर्षांच्या कालावधीत विजेच्या मागणीचं, लोकसंख्येचं पिल्लू... मोठं मूल म्हणून जन्माला आलं. आता त्याचं पालनपोषण जड जात आहे.

चंद्रपूरचं औष्णिक विद्युत केंद्र (२३४० मेगावॅट क्षमता) आशियातील सर्वांत मोठं वीजनिर्मिती केंद्र असावं. त्याच्या स्थापनेपासून कधी आला नसावा असा अनुभव यावर्षी तिथं येतो आहे. जेमतेम १८ मेगावॅट इतकीच वीजनिर्मिती होते आहे. गतवर्षी २००९ च्या पावसाळ्याच्या सुरुवातीला चंद्रपूर विभागात पाऊस खूप झाला. इतका, की जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश देऊन, पुराची शक्यता लक्षात घेऊन, धरणातील पाणी सोडण्यात आलं. पण झालं काय... पावसानं केली गम्मत! नंतर तो पाहिजे तसा बरसलाच नाही. आता चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनपासून १५ किमीवर असणारं इरई धरणाचं पाणी चंद्रपूर शहरवासीयांची पिण्याची पाण्याची तहानही भागवत असतं.

पाण्यावरील वीजनिर्मितीकेंद्राला ५००० घनमीटर याप्रमाणे दर तासाला पाण्याची आवश्यकता असते. जी पाऊसच न पडल्यानं पूर्ण होऊ शकत नाही. मे महिन्याअखेर वीजनिर्मिती संपूर्णत: बंद करण्याची वेळ आली आहे. कारण पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देणं गरजेचं आहे. त्यामुळे वीजनिर्मितीसाठी नवीन-नवीन पर्याय शोधणे आता गरजेचं आहेच.

कोकणात बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत. त्यांचा उपयोग व्हायला हवा. मंत्री वा आमदारांनी आपापल्या मतदार संघात असे काही पर्याय शोधायला हवेत. वित्तमंत्री सुनील तटकरे यांनी कोलाड इथे जलविद्युत केंद्र उभारायचे प्रयत्न केलेले आहेत. गरज आहे जागरूक राजकारण्यांची, अधिकाऱ्यांची, त्यापेक्षा जागरूक नागरिकांची.

एक किस्सा सांगतो : शहापूर तालुक्यात भातसा नदीवर जलविद्युत केंद्र आहे. तिथे एका खाजगी कंपनीनं छोटासा, ३ मेगावॅटचा

---

महानिर्मितीच्या संकेत स्थळावर अद्ययावत नियोजन प्रकल्प विभागाची माहिती :

**उभारणी चालू असलेले प्रकल्प**
**(निव्वळ क्षमता वाढ : ४७७० मेगावॅट)**

**१. परळी औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ७ (२५० मेगावॅट)–**

मुख्य संयंत्राचे आदेश दि. ३१.०८.०६ रोजी मे.भेल ला दिले. टेस्ट कोल फायरिंग प्रकल्पातील एक महत्त्वाचा टप्पा दि. ०२.०१.२०१० रोजी झाला. प्रकल्प कार्यान्वयन करण्याची कामे जवळ जवळ पूर्ण होत आली असून पूर्णत्वाने वीज निर्मिती मे २०१० अखेरपर्यंत अपेक्षित आहे.

**२. पारस औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ४ (२५० मेगावॅट) –**

मुख्य संयंत्राचे आदेश दि. ३१.०८.०६ रोजी मे. भेल ला दिले. टेस्ट कोल फायरिंग प्रकल्पातील एक महत्त्वाचा टप्पा दि. १८.०२.२०१० रोजी झाला. प्रकल्प कार्यान्वयन करण्याची कामे जवळ जवळ पूर्ण होत आली असून पूर्णत्वाने वीज निर्मिती जून २०१० अखेरपर्यंत होणे अपेक्षित आहे.

**३. खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ५ (५०० मेगावॅट)–**

मुख्य संयंत्राचे आदेश दि. २३.०१.०७ रोजी मे. भेल ला दिले. उर्वरित संयंत्राच्या (Balance of Plant - BOP) कामाचे आदेश दि. ०३.०७.०७ रोजी मे.बी.जी. आर. एनर्जी सिस्टीम लि. ला दिले. हायड्रॉलिक टेस्ट (ड्रेनेबल) प्रकल्पातील एक महत्त्वाचा टप्पा दि. ०५.११.०९ रोजी झाला. पुढील कामे वेगाने सुरू आहेत. पूर्णत्वाने वीज निर्मिती सप्टेंबर २०१० अखेरपर्यंत होणे अपेक्षित आहे.

**४. भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ४ व ५ (२ X ५०० मेगावॅट) –**

मुख्य संयंत्राचे आदेश दि. २३.०१.०७ रोजी मे. भेल ला दिले. उर्वरित संयंत्राच्या (Balance of Plant - BOP) कामाचे आदेश दि. ०५.११.०७ मे. टाटा प्रोजेक्टस् लि. यांना दिले. संच क्र. ४ च्या टी.जी. उभारणीची कामे दि. ३०.०४.०९ रोजी व संच. क्र. ५ च्या बॉयलर ड्रम लिफिटींग दि. २०.०४.०९ रोजी झाले. पुढील कामे वेगाने सुरू आहेत. पूर्णत्वाने वीज निर्मिती क्रमांक ४ द्वारे मार्च २०११ व संच क्र. ५ द्वारे मे २०११ अखेरपर्यंत होणे अपेक्षित आहे.

**५. चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ८ व ९ ( २ X ५०० मेगावॅट)–**

मुख्य संयंत्राचा पुरवठा, उभारणी व चाचणीचे आदेश दि. २५.०७.०८ रोजी मे. भेल ला दिले. उर्वरित संयंत्राच्या (Balance of Plant - BOP) कामाचे आदेश दि. १२.०६.०९ रोजी मे.बी.जी.आर.लि. यांना दिले. पुढील कामे वेगाने सुरू आहेत. पूर्णत्वाने वीज निर्मिती संच क्रमांक ८ द्वारे जुलै २०१२ अखेरपर्यंत व संच क्र. ९ द्वारे ऑक्टोबर २०१२ अखेरपर्यंत होणे अपेक्षित आहे.

Hydro Power Plant काढला. नदीच्या उजव्या अंगाला हे केंद्र तर डाव्या तीराला एका केंद्रीय मंत्र्याचं हजारो एकरांचं फार्म हाऊस आहे. फार्म हाऊसची वीज भारनियमनामुळे नेहमी जात असते. अशावेळी त्यांना जलविद्युत केंद्रावर मात्र वीज का सुरू असा प्रश्न पडायचा. मंत्र्याचा खाजगी सचिव केंद्रामध्ये आला.

''का हो, इथे वीज सुरू कशी?''

''इथं आमचं स्वत:चं वीजनिर्मिती केंद्र आहे.''

''तर काय झालं! इथून वीज आम्हाला नदीपलीकडे द्या.''

''तुम्हाला वितरण कंपनीकडूनच वीज मिळणार. त्यांना भेटा. आम्ही वीज निर्माण करतो आणि कंपनीला विकतो.''

''ते काहीही असो. आमचे साहेब मोठे असामी आहेत. तुमच्या काही अटी असतील त्या सांगा. ते सर्व पूर्ण करतील. पण ताजी ताजी, पहिल्या धारेची वीज आम्हाला मिळायलाच हवी!''

या संभाषणानंतर केंद्रातील अधिकाऱ्यांना हसावं की रडावं तेच कळत नव्हतं. हजारो एकर जागा घेण्यापेक्षा एखादं wind energy, solar energy वा Hydro Station काढण्याचा विचार का करत नाही हे राजकारणी....

राजकारण्यांचा अडाणीपणा, उद्दामपणा विजेच्या प्रश्नांना कारणीभूत ठरत आहे. भारनियमनाचे महत्त्व सांगायला कुणी नेता, मंत्री पुढे आला आहे असं चित्र कधी दिसत नाही. एखाद्या उपकेंद्राची तोडफोड होते. वीज अधिकाऱ्यांना मारहाण होते. तेव्हा कुणी कसं पुढं येत नाही.

विजेच्या भविष्यातील नियोजनाबाबत मंत्रालयात बोलताना कुणी दिसत नाही. भारत महासत्ता बनण्याच्या गोष्टी मात्र करायच्या. महासत्ता बनायला विजेच्या बाबतीत खूप गोष्टी करणं गरजेचं आहे.

चीनचं उदाहरण घ्या. गेल्या ४० वर्षांपासूनच तिथं Gas Insulated System आहे. ज्यामध्ये एखाद्या रूममध्येच उपकेंद्र होऊ शकतं. महाराष्ट्रात एक पोल उभा करायला, वायरी ओढायला ग्रामस्थ विरोध करताना दिसून येतात. चीनमध्ये विद्युतमनोरे एकाच रांगेत दिसून येतात. तेथील पीडित लोकांचा पुनर्वसनाचा प्रश्न चिनी सरकार अतिशय उत्कृष्टरीत्या हाताळत असणार किंवा जनताच समजूतदार असणार. राष्ट्रभावनेनं जागा अशा कार्याला देत असणार. नुकतंच वाचलं, की काही गावकऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे डोंबिवलीला एका विद्युतमनोऱ्यावर वायरी ओढल्या गेलेल्या नाहीत. त्यामुळे संपूर्ण डोंबिवली भागातील कमाल विजेची मागणी पूर्ण होऊ शकत नाही.

भविष्यातील नजीकच्या एक-दोन वर्षांत येणारे प्रकल्प बघता २०१३-१४ मध्येही विजेची मागणी पूर्ण होईल असे वाटत नाही. औष्णिक विद्युतकेंद्रे, जलविद्युतकेंद्रे, आण्विक विद्युत केंद्रे यांना काही मर्यादा आहेत.

आता जबाबदारी नागरिकांचीच ठरते. शक्य तितकी कमी वीज वापरण्याची. किंवा शक्य असल्यास स्वत:च्या घरापुरती Solar energy वापरण्याची.

स्वत:पुरता विजेचा प्रश्न नागरिकांनी काही वर्षे जरी सोडवला, तर लोडशेडिंगवर मात करता येऊ शकेल. एक राष्ट्रकार्य केल्याचं समाधानही मिळेल. पण 'मी जेवढी वीज वापरतो तेवढं बिल भरतो ना!' ही वृत्ती सोडली नाही तर...भारनियमन वाढत जाणार... जशी-जशी लोकसंख्या वाढत जाणार.... जसजशा गरजेच्या वस्तू, साधनं वाढत जाणार... (कारण ही साधनं विजेवर चालणारी असतात) वीजमागणी व पुरवठा यातील दरी वाढत जाणार....

आणि...एक दिवस...सर्वच बंद...किंवा धनवाल्याकडेच वीज पाणी भरेल...तेव्हा आताच ठरवायला हवं. विजेवर उत्तर शोधण्याचं...

**श्रीकांत पेटकर**
ए-०९/३०२,
चिनार, लोकउद्यान,
कल्याण (प.) - ४२१ ३०१.

## दोन नवीन पुस्तके




**प्रवर्तन - संदीप जावळे**

केवळ धर्म बदलल्यामुळे मानवी मनाचा मूलभूत दृष्टिकोनच बदलत असेल तर धर्मांतर हे परिवर्तनाच्या प्रश्नाचे निश्चितच मूलभूत उत्तर ठरते!
मूल्य : १२० रुपये
सवलतीत : ७५ रुपये




**अंधश्रद्धा निर्मूलन**
**प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
**- संदीप जावळे**

गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ या विषयाशी व चळवळीशी संबंधित असलेल्या लेखकाचे हे पुस्तक सर्वच अंधश्रद्धांचे अत्यंत निर्णायक, सडेतोड चर्चा करणारे मराठीमधील पहिलेच पुस्तक!
मूल्य : १२० रुपये
सवलतीत : ७५ रुपये

# मैत्रीची विस्तीर्ण आभाळमाया - अरुणा सबाने

## अस्मिता गुरव

जडतो तो जीव, लागते ती आस
बुडतो तो सूर्य, कळे तो आभास
....ज्याला नाही ठाव ते तर आभाळ...

'आभाळमाया' मालिकेच्या शीर्षक-गीताची आवर्जून आठवण झाली ते अरुणा सबाने यांची मुलाखत लिहायला सुरुवात केली असताना. अरुणाजींचं बालपण, शैक्षणिक टप्पा, प्रेमविवाहातील बंडखोरी, वैवाहिक आयुष्यातील पडझड, तीन छोट्या मुलांना घेऊन उभं राहण्याची धडपड...बँक, पोस्टातली (म्हणे बायकांना साजेशी) कारकुनी किंवा शाळेतील शिक्षिकेची नोकरी न करता 'प्रकाशन' व्यवसायाची वाट निवडणं, साहित्यिक कामगिरी आणि स्वानुभवातून सामाजिक संस्थांमध्ये काम करण्याची जबाबदारी स्वीकारणारी ही बाई तशी मनस्वी...तरीही खूप प्रेमळ.

अरुणाजींचा मित्रपरिवार प्रचंड मोठा...त्यांच्या या परिसरात अगदी ८ वर्षांच्या मुलांपासून ते ८० वर्षांच्या व्यक्तींचाही समावेश आहे...प्रत्येक मित्र-मैत्रिणीशी त्यांचे सूर वेगवेगळ्या पट्टीतील असूनही कुणात काय चांगलं आहे हे शोधून त्याला प्रोत्साहित करण्याची(बायकांच्या अंगी फारशी नसलेली) कला त्यांना अवगत आहे.

''तुम्ही लहानपणी खोडकर होता का हो?'' त्या मुलांच्या खोड्यांचं समर्थन करत होत्या तेव्हा मी त्यांना विचारलं.

त्या म्हणाल्या, ''आमचं बालपण खूपच मजेत गेलं. मुलींनी शिकावं, समृद्ध व्हावं म्हणून आईनं नेहमी पुढाकार घेतला. मी जात्याच हूड...बंडखोर स्वभावाची... पण आईनं 'तू मुलगी आहेस, असं बरं नाही'सारखे आदेश-सूचना कधीच दिल्या नाहीत...किंवा त्या काळात असायची तशी मुलीला दुय्यम वागणूक आमच्या घरी कधीच नसे. वडिलांचा, मोठ्या भावाचा पंचक्रोशीत



अरुणा सबाने

दरारा; त्यांनी देखील नेहमीच आम्हा सर्व बहिणींना अनेक चांगल्या गोष्टींसाठी प्रोत्साहन दिलं. त्यामुळे घरातलं वातावरण नेहमी हसतखेळत असायचं. बाहेरच्या राजकीय घटनांचं आम्हाला घरात कधी दडपण येत नसे... पंजाबराव सबानेंची मुलं किंवा बाबा सबानेंच्या बहिणी म्हणून आमच्याकडे विशेष आदरानं, कौतुकानं बघितलं जात असे...माझी आई नेहमी म्हणत असे, 'मुलांच्या नैसर्गिक वाढीत त्यांची मनोवृत्ती समजून घ्यायला हवी, आवश्यक तिथे वळण जरूर लावावं पण ऊठसूट धाक दाखवून मुलांना आपल्या दूर राहावसं वाटेल असं कधी करू नये.' हा संस्कार माझ्यावर खोलवर झालेला असल्यानं, मुलांच्या खोड्यांमागचं मानसशास्त्र समजावून घ्यावं अन् मग मुलांना समजावून सांगावं- मुलं नक्की ऐकतात. मुलांना तुमचा धाक असावा, भीती नसावी.''

''तुम्हाला कधी भीती वाटली नाही म्हणूनही असेल का, की तुम्ही त्या काळात आंतरशाखीय प्रेमविवाह करण्याचं धाडस केलं?''

''मी खरंच कधीही भीती बाळगली नाही अन् यापुढेही बाळगणार नाही. धाक म्हणशील तर तो मी माझ्या मनाचा आणि विवेकबुद्धीचा जरूर ठेवते. मी जाणीवपूर्वक कधीही कुठल्याही विषयाचं अवडंबर केलं नाही, करतही नाही. मी प्रेमविवाह केला, माझ्या पाटीलशाही घराण्यातला पहिला प्रेमविवाह, तोही अतिशय गरीब मुलाशी; तेव्हाही घरातल्या सगळ्यांचा विरोध पत्करून मी निर्णयाशी ठाम होते...आणि लग्न मोडून, मुलांना घेऊन स्वतंत्र राहण्याचा, जगण्याचा निर्णयही मी स्वबळावरच घेतला होता. नाही म्हणायला या सगळ्या प्रवासात प्रत्येक वेळी माझी आई माझ्या पाठीशी होती. तिचं पाठबळ मला कोणत्याही संकटांशी सामना करायला सामर्थ्य देत असे,''अरुणाजी सांगत होत्या; ''या सगळ्या काळात अनेक प्रकारची कामं मी करीत होते, काही नाईलाजानं करावी लागत होती...आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीनं प्रयत्न करणं अत्यंत आवश्यक होतं. नवऱ्याला सोडून आलेली- तीन मुलांची जबाबदारी पदरात असणारी बाई अगदी जवळच्या म्हणवल्या जाणाऱ्याच्या दृष्टीनंही 'नको ती ब्याद' असाच काहीसा सूर असू शकतो; पण मी ती संधी कुणालाच दिली नाही. मला माझ्या संदर्भात असं कुणाला वाटूच नये असं सतत वाटत होतं...नवऱ्यानं संसार मोडताना

अरेरावीनं म्हटलेलं, 'जगणं एवढं सोपं समजू नकोस, अखेर माझ्याच पायाशी यावं लागेल, काळं कुत्रं विचारणार नाही तुला'... आढ्याताखोरीला कृतीनं उत्तर देण्याची जबाबदारी माझी होती. त्यासाठी मी सुरुवातीला चिवडा-पापड, शिकेकाई करून विकणं, एका सायंदैनिकात, एका प्रेसमध्ये थोडंफार काम करणं अशी अनेक छोटीमोठी कामं करत राहिले. मुलांचं पालनपोषण-शिक्षणाच्या प्राथमिक गरजांची तरतूद करीत असतानाही मनात मात्र नेहमी चार-चौघींपेक्षा वेगळं काम करायचं हे घोळत होत. हळूहळू मुलींचं वसतिगृह सुरू केलं. पंचवीस हजार रुपयांचं कर्ज एका बँकेनं माझ्यावरच्या विश्वासानं मला दिलं म्हणून मला ते शक्य झालं. दरम्यानच्या काळात माझं कथालेखन सुरू होतं, छापून आलेल्या कथांचं कौतुक होत होतं आणि अशातच मी 'आकांक्षा' मासिक सुरू करण्याचा निर्णय घेतला...त्या दृष्टीनं तयारी सुरू झाली. भा. ल. भोळे, बाळासाहेब(बा.ह.कल्याणकर), ताराबाई भवाळकर, मृणाल गोरे यांसारख्या लोकांनी सहकार्याचा, आशीर्वादाचा हात डोक्यावर ठेवला आणि अंक बाहेर पडला.

अरुणाजी 'आकांक्षा'ची जन्मकथा सांगत होत्या. त्या नेहमी म्हणतात की, 'आकांक्षा' हे माझं सगळ्यात लाडकं आणि इच्छापूर्तीचं सुख देणारं अपत्य आहे...या बाळानं अरुणाजींना अफाट मित्रपरिवार मिळवून दिला; तसंच 'आकांक्षा'च्या बाळसेदार रूपानं 'प्रकाशन' व्यवसायाचं दालन सुरू झाल्यानं- 'आकांक्षा' प्रकाशिका, संपादक म्हणून अरुणाजींना प्रतिष्ठा-प्रतिमा मिळवून दिली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणारं क्षेत्र त्यांना मिळालं. अनेक लेखक-समीक्षक, कवी यांचं प्रेम, अकृत्रिम जिव्हाळा 'आकांक्षानं' मिळवून दिला...''तुम्हाला कुठे काही अडचणी वगैरे आल्याच नाहीत का?'' असं जेव्हा कुणी त्यांना विचारतं, तेव्हा त्या या व्यवसायातील चढ-उतार, स्पर्धा याविषयी आवर्जून सांगतात. तरीही तो व्यवसायाचा एक भाग म्हणून स्वीकारणं अपरिहार्य असतं हेही त्या समजावून सांगतात...ईर्ष्येबद्दल मात्र त्यांची भूमिका खूपच खिलाडू असल्याचं मी नेहमी पाहत आलेय... त्या म्हणतात-''इर्ष्या नसेल तर तुम्ही स्वतःला सिद्ध कसं करणार? मी सुरुवातीला 'आकांक्षा'चा अंक काढला आणि अनेक नामवंतांनी त्यात आवर्जून लिखाण पाठवलं तेव्हा काहींनी अशीही टीका केली की, 'सुरुवातीच्या कौतुकाचा बहर आटोपला की कळेल मासिक काढणं सोपं नाही- सत्यकथेसारखा दर्जेदार अंक बंद पडला, ही बाई काय दिवे लावणार आहे, वर्ष दोन वर्ष काढेल आणि अंक बंद पडल्याचं दिसेल' वगैरे वगैरे- मी उत्तरं दिली नाहीत, त्यात वेळ आणि शक्ती खर्च केली नाही...पण माझ्या पद्धतीनं काम करत राहिले आणि आज दहा वर्षे पूर्ण होऊन अकराव्या वर्षात पदार्पण केलंय. अजूनही अंक नियमित, निर्वेधपणे निघतोय... वाचकांच्या पसंतीच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होतेय. काळ आपल्या पद्धतीनं उत्तर देत असतो. आपण फक्त आपल्या कामात सातत्य ठेवावं हे मी पाळत आलेय... सुरुवातीला टीका करणारे आता कौतुक करतात...मित्राचं शत्रूत रूपांतर होण्यापेक्षा टीकाकारांचं मैत्रीत रूपांतर होणं मी अधिक महत्त्वाचं मानते...''

एकदा बोलण्याच्या ओघात आमचा विषय स्त्रीचं कौटुंबिक-सामाजिक भान आणि तिचं स्थान या मुद्यावर आला आणि अरुणाजी पटकन म्हणाल्या,''दोन्ही ठिकाणी तिचं भान उत्तम असूनही तिला दुय्यम स्थान देण्याच्या प्रक्रियेत जेवढी पुरुष मंडळी पुढे असतात ना तितक्याच स्त्रिया स्वतःदेखील त्याबाबत उदासीन असतात. वास्तविक, स्त्रीला उपजतच जबाबदाऱ्यांचं भान असतं. अष्टभुजा ही केवळ मंदिरात मांडलेली मूर्ती नाही तर स्त्री वापरत असलेल्या अष्टसिद्धी आणि अष्टावधानी वृत्तीचं ते प्रतीक आहे; गुणांचं दर्शन केवळ मंदिरात होत असं नाही तर जरा लक्षपूर्वक बघितलं तर प्रत्येक स्त्री ही अष्टभुजेच्या रूपात वावरतच असते...संसारात खरं तर स्त्रीच जबाबदारी जास्त उचलत असते. असं असूनही स्त्रियांसाठीच वेगवेगळ्या सामाजिक संस्था का काढाव्या लागतात? अरुणाजी 'माहेर' संस्थेच्या अध्यक्षा, बहुजन रयत परिषद, अखिल भारतीय जलसंस्कृती मंडळ, दलित मानवाधिकार समिती, प्रगतीशील लेखक संघ अशा अनेक संस्थांतही त्या प्रत्यक्ष सहभागी होतात. स्त्रियांच्या मदतीसाठी त्या नेहमी तत्परतेनं पुढाकार घेतात. या संस्थांमधून वावरतानाचे त्यांचे अनुभव, त्यांची प्रतिक्रिया समजून घेणं मला आवश्यक वाटलं...

''परित्यक्ता, कुमारीमाता, कौटुंबिक पीडित महिला, बलात्कारित, जबरदस्तीनं देहविक्रय करायला भाग पाडणं यासारख्या कितीतरी समस्या स्त्रियांच्याच संदर्भात उद्‌भवत असतात. स्त्रीचंच जीवन असुरक्षित, असहाय्य, निराधार होत असल्याचं दिसतं, आणि या सगळ्या फसवणुकीच्या वाटेवरून अडखळत, ठेचकाळत चालत असताना समाजाच्या भ्रामक कल्पनांना स्त्रीलाच तोंड द्यावं लागतं. यातून कित्येकदा स्त्रिया आत्महत्या करतात, आत्महत्येचा प्रयत्न अयशस्वी झाला तर बदनामीच्या भीतीपायी तिच्या कुटुंबातील जवळचे नातेवाईकही तिची जबाबदारी नाकारतात; अशावेळी तिच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची पूर्तता करणारी संस्था ही तिच्या दृष्टीनं अत्यंत गरजेची गोष्ट असते. आपल्याकडे समाजात एक विसंगती सतत बघायला मिळते. स्त्रीवर अत्याचार करून तिला स्वीकारणं लोकांना आवडत नाही; मात्र अशा संस्थांचा उदोउदो केला जातो- हाडामासाच्या जिवंत माणसाला नाकारायचं आणि दगडविटेच्या संस्थेचा गौरव करायचा. मला एका दवाखान्यात भिंतीवर लॅमिनेट करून लावलेल्या, ईश्वराला केलेल्या विनंतीपत्राचा मजकूर आठवतो- हे ईश्वरा, दुसऱ्यांच्या रोग- यातनेवर माझा उदरनिर्वाह अवलंबून असल्याचं मला माहीत आहे; पण माझा त्याला नाईलाज आहे. मी ईश्वराच्या या

नियोजनाला स्वीकारताना कर्तव्याची विवेकबुद्धी हरवणार नाही याची सजगतेनं काळजी घेईन- वगैरे वगैरे. मला जेव्हा जेव्हा सामाजिक कार्याचा गौरवसोहळा होतो, तेव्हा तेव्हा ते पत्र मनात तरळून जातं. क्षणभर असंही मनात आल्यावाचून राहत नाही की- महिलांवर अन्याय अत्याचारच झाले नाहीत अन् त्यांच्यासंदर्भात काम करावेचं लागलं नाही, संस्थांची गरजच पडली नाही तर किती बरं!''

इतरांच्या लेखनाचं, कवितेचं कौतुक करणं, त्यावर भरभरून बोलणं ही अरुणाजींची खासियत. आवडलेली कविता इतरांना ऐकवणं, आवडलेल्या कथा-कादंबरी-समीक्षेवर चर्चा करणं हे अरुणाजींशी भेट, मग ती फोनवर असो की, प्रत्यक्षात असो, त्या भेटीत साहित्यिक चर्चा झाली नाही असं कधी होत नाही. एखाद्यानं त्या साहित्यकृतीबद्दल नापसंती व्यक्त केली तर अरुणाजी त्याचं म्हणणं ऐकून घेतीलही; पण त्याच्या म्हणण्याची री ओढणार नाहीत, अगदी त्यांचंही त्या लिखाणाबद्दल मत नकारार्थी असलं तरी...याचा अनुभव मी अनेकदा घेतलाय- एकदा मी त्यांना त्याबद्दल न राहवून विचारलंच...तुम्हालाही तर ते पुस्तक फारसं पसंत नव्हतं. मग तुम्ही त्यांचं म्हणणं फक्त ऐकून घेतलं आणि विषय का बदलवला?

''एखादी गोष्ट नाही आवडली तर सोडून द्यावी, निगेटिव्ह चर्चा किती का करत बसायची? आवडत्या गोष्टींचे अनेक पदर समजून घ्यायला आपल्याला वेळ पुरत नाही आणि नावडत्या गोष्टींवर उगाच वेळ खर्च का करायचा? साहित्यिकाला अभिव्यक्ति-स्वातंत्र्य आहे म्हणून तो काहीही लिहितो तर वाचक म्हणून आपल्यालाही स्वातंत्र्य आहेच की; पटलं तर वाचावं नाही तर स्वतःला पुस्तकापासून वाचवावं...अगदी साधं सूत्र आहे बघ. शिवाय, एकदा तुम्हाला निगेटिव्ह चर्चेत भाग घ्यायची सवय झाली की तुम्ही स्वतःचा विकास थांबवता...अर्थात याचा अर्थ समीक्षकात्मक टीका-टिपणी करू नये असं नाही- पण अनेकदा साहित्यकृती बाजूला पडते आणि चर्चेतली नकारात्मकता त्या साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल वाहवत जाते- असं होऊ नये असं मला वाटतं म्हणून नापसंती व्यक्त करण्याचा कल कसा आहे, त्याची जाण, त्याची बौद्धिक कुवत हे सगळं पाहून आपण ठरवायचं की आपली परस्परांची भेट, एकत्र येणं हे रसास्वाद घेण्यासाठी असावी, की कुचाळ्या करणारी ठरावी- अजून एक सांगू, वाईट बोलायला फारसं काही लागत नाही; पण एखाद्या गोष्टीचं कौतुक करायला, त्यातील मर्म समजून घ्यायला रसिकता आणि मोठं मन असावं लागत- आपण आपलं मन मोठं करावं असं मला वाटतं. हीच चर्चा व्यासपीठावरून त्या पुस्तकावर करायची असेल तर मात्र मी कधीच उगाचच गुलगुलू बोलत नाही. तिथे माझं मतं मी स्पष्टपणे, परखडपणे मांडते. तशीही मी स्पष्टवादी म्हणूनच प्रसिद्ध आहे.''

'विमुक्ता' ही कादंबरी की आत्मकथन? असा प्रश्न जेव्हा विचारला जातो, तेव्हा अरुणाजी कुठेही लपवा-छपवीचा किंवा वृथा समर्थनाचा प्रकार करत नाहीत- त्या म्हणतात कादंबरी 'फॉर्म'मध्ये उलगडत जाणारी, सत्यघटनेवर आधारित ही एक कहाणी आहे. ही व्यक्तिगत अरुणा सबाने या स्त्रीची आहे की अन्य कुणाची याला महत्त्व नाही. विमुक्तातही 'वसू' ही एकमेव नाही. गावोगावी अशा वसू असू शकतील-भेटतील; पण माझा भर आहे तो वसूनं कुढत पिचत जगू नये किंवा आत्महत्येला कवटाळू नये, तर 'विमुक्ता'तल्या वसूसारखं तिनं स्वतंत्र जग निर्माण करावं, स्वतःला सिद्ध करावं. या अर्थानं 'विमुक्ता' कडे बघावं...असं मला वाटत. अरुणाजी 'विमुक्ता'बद्दल बोलायला लागल्या की जाणवतं ते हे, की नायिका वसू-तिच्यातली लेखिका आणि लेखिकेच्या खोलवर जिच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचे चरचरीत ठसे उमटलेले आहेत- असं म्हणावं तर त्या ज्या पोटतिडकीनं बोलतात त्यावरून ती केवळ एखाद्या स्त्रीची व्यक्तिरेखा रेखाटतात असं नाही तर स्त्रीजीवनाचं, तिच्या जगण्या-वाचण्याचं सूत्र हाती घेऊन तिला पावलोपावली रोखू पाहणाऱ्या, स्त्रीला दुय्यम, भोगवस्तू म्हणून वागवण्याची मानसिकता याचं प्रतिनिधित्व ही कादंबरी करते- ही खरी ती भळभळती जखम आहे...त्यांच्या जवळपास प्रत्येक कथेतून स्त्रीजाणिवांचे एकेक पदर उलगडण्याचा प्रयत्न असल्याचं दिसतं...अर्थात त्या ज्यापद्धतीचे जीवन जगताहेत, जे जे सोसत आलेल्या आहेत त्याच अनुभवांचं रेखाटन त्यांनी केलेलं आहे... तरीही ते 'वास्तववादी' म्हणण्याकरता असायला हवी तशी त्याची (निर्मितीपूर्वक जपलेली, टिपलेली) दाहकता त्यात प्रकर्षानं 'आणलेली' नसल्यानं या रेखाटनाचे रंग हे भडक नाहीत...तसंच त्यांचं स्वरूप हे जाणीवपूर्वक अनुभवांचं संकलन करून त्याची चर्चा रंगवण्याचाही प्रकार नाही. त्यामुळे अरुणाजीचे कथासंग्रह, कथा हे 'बहुचर्चित'साहित्य आहे असं नाही. तरीही 'विमुक्ता'ला मिळालेले प्रतिष्ठेचे पुरस्कार हे सत्याला कधीही मरण नसतं, याची प्रचिती देतात.

अरुणाजींची जीवनाकडे बघण्याची निकोप दृष्टी आणि परिश्रमाची तयारी हेच त्यांच्या उत्साहवर्धक जगण्याच गमक असावं. जीवनावर त्या खरंखुरं प्रेम करतात हे त्यांच्या निकटवर्तीयांना माहीत आहे; अगदी त्यांच्या घटस्फोटाच्या वेळी त्यांच्या वकिलांनीसुद्धा त्यांना प्रमाणपत्र दिलंय की, 'जीवनावर तुमच्याएवढं प्रचंड प्रेम करणारी बाई मी अद्याप बघितली नाही.' 'जीवनावर' त्या नुसतं प्रेमच करतात असं नाही तर जीवनाकडे सजगतेनं पाहतात, इतरांनी पाहावं याकरता अभियान राबवतात. हे काय नवीन? तर हे नवं नाही जुनंच आहे. इथं 'जीवन' हे पाणी या अर्थानं म्हणतेय. 'जलसंवर्धन' अभियान अरुणाजी नुसत्या सहभागी आहेत असं नाही तर शासकीय पातळीवर राबवण्यात येणाऱ्या उपक्रमातील एक ॲक्टिव्ह सदस्य आहेत. 'जलसाक्षरता-जलसंवर्धन-जलसाहित्य'या

तीनही पातळ्यांवर त्यांचं काम सुरू आहे. महानगर पालिकेच्या त्या वॉटरफ्रेंड आहेत. अखिल भारतीय जलसंस्कृती मंडळ, इंडिया वॉटर पार्टनरशीप अशा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांवर त्या आहेत. १९९४ पासून या विषयाच्या कामाशी अरुणाजींची बांधिलकी आहे. महाराष्ट्रातील गावोगावी या अभियानाच्या निमित्तानं त्या भटकलेल्या आहेत; भटकत आहेत. पहिल्या अखिल भारतीय जलसाहित्य संमेलनाच्या त्या उद्गात्या आहेत. 'जलसाहित्य' या शब्दाची, या संमेलनाची निर्मितीच मुळी त्यांच्या कल्पक बुद्धिमत्तेचं फार मोठं लक्षण आहे. पाणी प्रश्नामुळे त्या नेपाळपासून जपानपर्यंत पोचल्या आहेत.

अरुणाजींबद्दल मला नेहमीच एका गोष्टीचं कुतूहल वाटतं आणि अजूनही ते कमी झालेलं नाही-ते म्हणजे या बाईला एवढं सगळं करायला वेळ कसा मिळतो? मुलांच्या विकासाकडे त्यांचं बारकाईनं लक्ष आहे. 'आकांक्षा'ची कार्यकारी संपादिका असलेली समीक्षा, व्यवसायात गुंतलेला स्वप्निल-मुलगा आणि मुंबईला मरचंडायझर (merchandizer) असलेली धाकटी पियुषा, त्यांच्या प्रत्येक आवडीनिवडीत, निर्णयात अरुणाजींची 'आई'ची पारखी नजर तर आहेच; त्याचबरोबर मुलांना आईचा धाक आणि शिस्त ठाऊक आहे. त्यांच्या एका मित्रानं 'फादर्स डे'ला त्यांना संदेश पाठवला-अरुणाजींनी त्याला गमतीनं म्हटलं, "अरे बाबा, 'मदर्स डे'ला विसरलास म्हणून 'फादर्स डे'ला चुकून एसएमएस केलास का मला?" त्यावर त्यांच्या मित्रानं दिलेलं उत्तर मार्मिक आहे. त्यानं म्हटलं, "एक तर मी चुकून वगैरे मेसेज केलेला नाही. 'फादर्स डे'ला जाणीवपूर्वक तुम्हाला अभिवादन करतोय. कारण मी पाहत आलोय की, तीन मुलांना जन्म दिला म्हणून तुम्ही नैसर्गिकरीत्या आई आहातच; पण मुलांच्या पालनपोषणातील पालकांच्या दृष्टीनं महत्त्वाची जबाबदारी मुलांच्या वडिलांची असते ती देखील तुम्ही एकट्याच समर्थपणे पार पाडता आहात म्हणून तुम्ही केवळ 'बाईमाणूस' आहात असं नाही तर तुम्ही 'बापमाणूस' आहात असं मला वाटतं, म्हणून आदरपूर्वक मी तुम्हाला 'फादर्स डे'ला अभिवादन करतोय."

पुस्तक वाचणं आणि त्यावर चर्चा करणं हा त्यांच्या गप्पांचा गाभा असल्याचा माझा नेहमीचाच अनुभव आहे. कित्येक कवींच्या उत्तम कविता अरुणाजींकडून ऐकल्या आहेत. बाळासाहेबांच्या (बा.ह.कल्याणकार) पुस्तकाचं कथानक-कविता, दभिंच्या समीक्षालेखनाबद्दल, सुलभा हेर्लेकर, अंजली कुलकर्णी, मीरा, आसावरी काकडेंच्या कित्येक कविता अरुणाजी बोलताबोलता सहजपणे ऐकवतात. दिवाकरदादांचं असो किंवा मिरजकर सरांचं असो, पुस्तकं हे त्यांच्या बोलण्याचे आवडीचे विषय असतात. अरुण म्हात्रेंची, सौमित्रची नवीन रचनाही त्यांच्या कौतुकाचा विषय असतो. कविता शनवारे, डॉ. सीमा साखरेंची कामगिरी, वामन निंबाळकर यांची अगदी अलीकडची रचना, चंदू वानखेडेंच्या चळवळीची दिशा, चंद्रमोहन कुलकर्णीचं रेखाटन हे सारे अरुणाजींचे जिव्हाळ्याचे विषय. प्रत्येक विषयानं त्यांच्या मनाची एक जागा व्यापलेली आहे आणि या विविधतेतही एकच आशय सहजपणे दिसून येतो तो म्हणजे त्यांची प्रत्येकाविषयीची आपुलकी, निर्व्याज प्रेम आणि आनंद देण्याघेण्याची उत्कट अभिजात वृत्ती.

त्यांच्या स्थलांतरीय आयुष्यात सुरुवातीस त्यांच्याबद्दल टीका करणारी मंडळी काहीबाही बोलताना दिसायची. "तुम्ही त्यांना खरमरीत उत्तर का देत नाही?" असं विचारता त्या म्हणतात, "आपलं काम बोलतं, आपण बोलण्यापेक्षा. मी जेव्हा घटस्फोट घेतला तेव्हा, किती पद्धतीचे आरोप झालेत. लोक काय काय बोलले.२ पण मी त्यांची खरडपट्टी काढत बसले असते तर फक्त शत्रूंची संख्या वाढली असती. लोक म्हणायचे, ही बाईच ज्यादा शहाणी- तर मी माझं विश्व उभं केलं, हिला काय जमणार आहे-तर मी व्यवसाय, लेखन आणि सामाजिक काम केलं-करतेय-करणार आहे. लोक म्हणाले-काय दिवे लावणार आहे एकटी?- तर मी माझ्या मुलांना शिकवलं, समृद्ध केलं. ब्रोकन हाऊसमधली इतर मुलं आणि माझी तीनही मुलं बघा. अशक्त कौटुंबिक व्यवस्थेतली मानसिकरीत्या सशक्त, निरोगी मुलं आहेत ती; आपआपल्या क्षेत्रात आपल स्थान कमावलेली. लोकांना जे वाटत होतं की, मी माझी काहीही चूक नसताना लाथा खाव्या, कुढत-पिचत जगावं आणि चार काळ्यामण्यांच्या अस्तित्वासाठी स्वतःचं आयुष्य काळं करावं, तर मी ते तसं केलं नाही आणि खरं तर कुठल्याही स्त्रीनं असं करू नये असं माझं मत आहे. स्त्रीच्या अंगी समजूतदारपणा असावा, नम्रता असावी हे मलाही पूर्ण मान्य आहे; मात्र विनाकारण अन्याय सहन करणं म्हणजे समजूतदारपणा नाही, अजिजी म्हणजे नम्रता नाही याची जाण प्रत्येक स्त्रीनं ठेवावी आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे 'आत्मभान'-स्त्रीचं आत्मभान शाबूत असेल तर ती कार्यकर्तृत्वानं कळस गाठू शकते आणि एकदा का तुम्ही तुमचं कर्तृत्व सिद्ध केलं लोक तुमची दखल घेतातच. जग जसं दाबून मारणारं आहे तसंच चांगल्याचा स्वीकार करणारंही आहे."

अभिव्यक्ती मीडिया सेंटर संस्थेनं भारतातल्या वेगळं काम करणाऱ्या कर्तृत्ववान दहा महिलांमध्ये अरुणा सबाने यांची निवड केली आहे. स्त्रीशक्ती, त्यांच्यातील जिद्द, प्रेमानं समजवण्याची आणि आपुलकीनं एखाद्याला जवळ करण्याची कला, समाजाला तोंड देण्याचं सामर्थ्य तसचं घरगुती अडचणींवर मात करून शून्यातून यशस्वीपणे विश्व निर्माण करून आपल्या आवडणाऱ्या क्षेत्रात काम करण्याची आकांक्षा या सर्व गुणांमुळेच त्यांची अभिव्यक्ती मीडिया सेंटरनं निवड

केली. कमला भसीन यांच्यासारख्या कर्तृत्ववान स्त्रियांबरोबर अरुणा सबाने यांचा सहभाग असणं ही महाराष्ट्रीय म्हणून अभिमानास्पद बाब आहे. अरुणाजींना त्यांच्या आयुष्यात प्रपंचात बरेवाईट अनुभव घ्यावे लागले तसेच सन्मानाचे, गौरवाचे, पुरस्कारप्राप्त ठरण्याचेही अनेक सोनेरी क्षण त्यांच्या आयुष्यात आलेत. येत आहेत. भविष्यात येतीलही. आतापर्यंत त्यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल स्मिता पाटील पुरस्कार, कस्तुरबा गांधी पुरस्कार, वंचित मित्र पुरस्कार, पतंगराव कदम फाउंडेशन पुरस्कार, समाजप्रबोधन पुरस्कार, साहित्य साधना पुरस्कार, राष्ट्रीय युवा पुरस्कार, मैत्री पुरस्कार, ना. ह. आपटे पुरस्कार असे महत्त्वाचे अनेक पुरस्कार मिळालेत.

''माझ्या आयुष्यात मी दोन वारांगनांना आधार देऊ शकले, अनेक स्त्रियांना मार्गी लावू शकले, हे माझ्या आयुष्यातलं मोठं समाधान आहे,'' असं त्या अभिमानानं सांगतात. पंचवीस मुलांचं शैक्षणिक पालकत्वही त्यांनी स्वेच्छेनं स्वीकारलं आहे. अरुणाजींच्या निरपेक्ष मैत्रीसाठी त्यांना भेटल्यानंतर सहजच वाटेल-

जडतो तो जीव
लागते ती आस
बुडतो तो सूर्य
कळे तो आभास
दाटते ती माया
आभाळमायाऽ-

कारण अरुणा सबाने ही केवळ मैत्रीण नसते तर ती मैत्रीची विस्तीर्ण आभाळमाया असते!

**अस्मिता गुरव**
जळगाव

---

स.न.वि.वि.,

महाराष्ट्र राज्याचा सुवर्ण महोत्सवाचा योग साधून मे महिन्याचा 'रुची' माहितीपूर्ण व वाचनीय झाला आहे. राज्य स्थापनेला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वृत्तपत्रांच्या संपादकाचे लेख वाचनीय आहेत; याशिवाय, डॉ. विद्यागौरी टिळक यांच्या आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, मोती बुलासा या मारवाडी साहित्यप्रेमीबद्दलचा लेख नवीन माहिती देणारा आहे. मध्यप्रदेशातील खांडवा येथे राहणारा एक मारवाडी पुण्या-मुंबईला येऊन 'सुविचार समागम' मासिक चालवितो, त्याकरिता मराठी संस्कृती व भाषा यांचा अभ्यास करतो, एकोणिसाव्या शतकात मराठी संस्कृतीत गतिमान स्थित्यंराचा टप्पा येतो, त्यामध्ये भाग घेऊन वाङ्मय इतिहासाचा एक दुवा बनतो, ही कौतुकास्पद गोष्ट समजली. त्यांच्याविषयी आणखी जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली.

संपादक दिलीप चावरे यांनी साहित्याचे प्रयोजन या लेखात अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचे 'माझी घडण' या आत्मचरित्रामधील सामाजिक व राजकीय परिस्थितीचे विश्लेषण नोंदवले आहे. गांधी-नेहरू-पटेल यांच्याकडे असलेले नेतृत्वगण व त्यावेळच्या महाराष्ट्राच्या नेतृत्वात असलेला राजकीय चाणाक्षपणाचा अभाव त्यात अण्णांनी नोंदविला आहे. कालांतराने अण्णांनी भाषावार प्रांतरचनेला दिलेला पाठिंबा वगैरे गोष्टी हल्ली मराठी साहित्यात अभावाने आढळतात. लेखकानं म्हटल्याप्रमाणे नुसता मराठीचा अभिमान बाळगून, त्याकरिता सरकारला दोष देऊन आपली जबाबदारी झटकण्याची वृत्ती बदलणे गरजेचे आहे.

महाराष्ट्राच्या बाहेरून नोकरीनिमित्त आलेल्या माणसाने मराठी शिक्षणाची, मराठी जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केल्यास तशा प्रकारचा एखादा अभ्यासक्रम आपण कोठे सुरू केला आहे? तो सर्वत्र माफक फीमध्ये उपलब्ध असावा. जसा MS-CIT आहे. तरच मराठीचा प्रचार इतर भाषकांत होऊ शकेल. पुणे साहित्य संमेलनात अमिताभचे भाषण हिन्दीतून ऐकावे लागले. चाळीस वर्षे महाराष्ट्रात राहिलेल्या साहित्यिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या अमिताभची ही स्थिती! याला आपणच जबाबदार आहोत असे वाटते. त्यांनी भाषणात फक्त दोन-तीन मराठी कवींची नावे (सुरेश भट वगैरे) घेतली. मग स्वत:च्या वडिलांच्या कविता ऐकवल्या.

आचार्य अत्र्यांनी महाराष्ट्रासाठी केलेल्या योगदानाबद्दल अरविंद गोखल्यांचा लेख डोळ्यांत अंजन घालणारा असून पूर्वीच्या साहित्यिकांबद्दल आपण किती उदासीन आहोत हेच दिसते.

आल्हाद गोडबोले यांचा 'सुवर्ण महोत्सवाची फळे' (गोड व कडू) हा लेख गेल्या पन्नास वर्षांत घडलेल्या घटनांची नोंद घेणारा व त्यापासून काय शिकायचे हे सांगणारा आहे. आपली कलेबद्दलची 'सौंदर्यदृष्टी' कशी कमी-कमी होत चालली आहे व गेल्या पन्नास वर्षांत कला प्रातांत घडलेल्या घटनांचा उल्लेख करून रघुवीर कुल यांनी यातील आपले (सरकारचे) दुर्लक्ष व उदासीनता दाखविली आहे.

सुवर्ण महोत्सवानिमित्तचा 'रुची'च्या अंकाला विशेष अंकाचे स्वरूप आले आहे. अंक संग्राह्य झाला आहे.

**- प्रभाकर भिडे**
C- 604, देवश्री गार्डन,
आर. डब्ल्यू. सावंत मार्ग, माजिवडा, ठाणे.

# हरवंदे यांचे ÷लालबाग' हा अस्सल मौलिक दस्तऐवज

## जयंत पवार

'लालबाग' या आदिनाथ हरवंदे यांच्या पुस्तकाच्या निमित्तानं आज माझा भूतकाळ माझ्या मनात पुन्हा एकदा जागा झाला. या भूतकाळाची जमीन, त्या काळाचा परिसर यांची गजबज मनात उभी राहिली. त्या काळातल्या आठवणींचे ध्वनी, श्वासात अजून रेंगाळलेले मातीचे वास आणि परिसराचा स्पर्श यांची दाटी झाली. आपल्या मनात आपलं शैशव, आपलं तारुण्य पुन्हा जागवून ते क्षण आठवणींच्या रूपात पुन्हा जगायला लावणारी कोणतीही कलाकृती वाचकाला आवडत असते. हरवंदे यांची 'लालबाग' ही साहित्यकृती अशीच मला आवडली. हे पुस्तक लिहून हरवंदे यांनी मराठी साहित्यात मौलिक भर टाकली आहे असं मला वाटतं.

हरवंदे यांचा काळ माझ्या आधीचा आहे. मी जन्मलो, वाढलो, राहिलो तो लोअर परळच्या सनमिल गल्लीमध्ये. माझी शाळा शिरोडकर हायस्कूल. ही परळची आणि माझे बहुतेक सगळे वर्गमित्र लालबागला राहणारे. पुढे मी गेलो महर्षी दयानंद महाविद्यालयात आणि नोकरी केली घोडपदेवच्या न्यू हिंद टेक्स्टाईल, म्हणजे पूर्वीच्या कैसर-ए-हिंद या मिलमध्ये. लालबाग हा आम्हा कामगार वस्तीतल्या लोकांचा पायाखालचा रस्ता. नोकरदार मध्यमवर्गीय माणूस खरेदीला जसा दादरला जातो तसा कामगार खरेदीला लालबागला यायचा. तिथल्या पेकोच्या दुकानातून चपला घ्यायच्या, गुरुदत्तमधून पुस्तकंवह्या खरेदी करायच्या, गणेश गल्लीच्या कोपऱ्यावरच्या पालव टेलर्सकडे वडील आमचे शाळेचे युनिफॉर्म शिवायला द्यायचे. येताना लाडू सम्राटमध्ये वडा खायचा. एप्रिल-मे महिन्यांमध्ये आमच्या आया मसाला कुटायला गरमखाडा मार्केटमध्ये घेऊन यायच्या. गणपतीला गावी पाठवायची कंठी, हार, पूजेचं सामान यांची खरेदी लालबाग मार्केटमधून व्हायची.

**'लालबाग' पुस्तकाच्या प्रकाशन समारंभास काही कारणास्तव जयंत पवार उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी त्यावेळी आपले विचार लिहून पाठवले. ते येथे देत आहोत.**

आमच्यासाठी अख्खा लालबाग हाच एक गजबजता मॉल होता. असा मॉल, जिथे मालापेक्षा माणसांना किंमत होती.

लालबाग म्हटलं की मला गणपतीचे दिवस आठवतात. शिरोडकर शाळेतून संध्याकाळी सुटलो की मित्राबरोबर गणेशगल्लीच्या मंडपात यायचो. तिथे पायाला रग लागेपर्यंत आम्ही श्याम सारंगांचे मूर्तिकाम बघत उभे असायचो. श्याम सारंगांचे बंधू राम रंगारी बदक चाळीचा गणपती करायचे. दीनानाथ वेलिंग चिंचपोकळीचा गणपती करायचे. विठ्ठल झाड तेजूकाया मॅन्शनचा. व्यंकटेश कांबळींच्या चित्रशाळेत मोठमोठ्या मूर्ती घडायच्या. राजाही तेव्हा राजा नव्हता झालेला, लालबाग मार्केटचा गणपती म्हणूनच ओळखला जायचा. गणेशचतुर्थीच्या आदल्या रात्री मी एकटाच घराबाहेर पडून अख्खा लालबाग पायी फिरत असे. छोट्या कारखान्यांमधून गणपतीच्या छोट्या मूर्ती दाटीनं मांडलेल्या असायच्या. काही गणपती अजून तयार होत असायचे. भुरभुरीत पाऊस पडून गेलेला असायचा. त्याचा दमट वास आसमंतात भरलेला असायचा आणि त्यात गणपतीच्या मूर्तींच्या शाडूचा वास मिसळलेला असायचा. कुठे ढोल वाजत असायचे, कुठे लेझीम खुळखुळत असायची, कुठे पाटावरून गणपती नेत असलेले बाप्ये 'गणपती बाप्पाऽ मोरया' अशी आरोळी ठोकत जात असायचे. ते वास, ते आवाज माझ्या श्वासात, कानात, संपूर्ण शरीरात असे मिसळून गेले आहेत की बाहेर काढणं कुणालाही शक्य होणार नाही. मात्र गारुड्याची पुंगी वाजताच साप जसे बिळातून बाहेर येतात तसे ते निमित्तानिमित्तानं जागे होतात. 'लालबाग' पुस्तक वाचल्यावर तसं झालं.

लालबागचा राजा म्हणजे लालबाग मार्केटातल्या कोळ्यांचा गणपती. छोट्या-छोट्या व्यापाऱ्यांचा, त्यांच्या गिऱ्हाईकांचा, सर्वसामान्यांचा गणपती. बहुजनांचा गणपती. आज तो पैसेवाल्यांचा गणपती झालाय. या गणपतीच्या स्थित्यंतराचा इतिहास हा लालबागच्या स्थित्यंतराचा इतिहास आहे. लालबाग-परळ ही बहुजनांचीच वस्ती. अठरापगड जातीचे लोक इथे भांडत-तंटत, एकमेकांना आधार देत, मिठ्या मारत, गुण्या-गोविंदाने राहिले. मराठा आणि ओबीसी जातींचा पगडा असलेल्या या भागात भाजप किंवा काँग्रेस रुजणं शक्यच नव्हतं. हा आधी कम्युनिस्टांचा बालेकिल्ला होता. नंतर शिवसेनेचा झाला. कम्युनिस्ट कामगारांसाठी लढले तर सेनेनं मराठी अस्मितेचा प्रश्न लावून धरला. खरं तर मराठी अस्मितेचा प्रश्न संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातच उपस्थित झाला

होता आणि हे आंदोलन लढवण्यात अग्रभागी असलेल्या गिरणी कामगारांच्या जीवनजाणिवेचा नकळत एक भाग झाला होता. परंतु संयुक्त महाराष्ट्र समिती बरखास्त झाल्यावर डाव्या पक्षांनी या मुद्याला स्पर्शही केला नाही. त्यामुळेच सेनेनं अस्मितेचं भावनिक आवाहन करताच कामगारांची मुलं सेनेकडे गेली. कम्युनिस्टांनी मराठी अस्मितेचा मुद्दा हाती घेऊन त्याला विधायक वळण दिलं असतं तर पुढे मराठी माणसांच्या नावानं भांडवलदारांच्या, पैसेवाल्यांच्या, बिल्डरांच्या हिताचं राजकारण खेळलं गेलं नसतं. याच लालबागमध्ये कृष्णा देसाई होते आणि बंडू शिंगरेही होते. तोडपाणी करून मराठी माणसांच्याच खोल्या खाली करण्याच्या कारवाया चाळीस वर्षांपूर्वी लालबागमध्ये सुरू झाल्या होत्या.

लालबाग हा केवळ मुंबईचा एक हिस्सा नाही, तर मुंबईच्या जडणघडणीत प्रमुख वाटा उचलणाऱ्या माणसांची ती एक संस्कृती आहे. इथे पोटापाण्यासाठी कोकणातून, तळकोकणातून, घाटावरून, नगर-खानदेशातून माणसं आली. येताना आपले देव, पंथ, उपासना पद्धती, रीतीरिवाज, खेळ आणि कला घेऊन आली. अशा अनेक उपसंस्कृती पोटात घेऊन लालबाग ही एक सर्वसमावेशक संस्कृती उभी राहिली. वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशांतून येऊनही एकमेकांना पकडून राहिली. एकाच्या घरातल्या चिकन-मटणाच्या वाटच्या शेजारी न मागता पोचायच्या. दिवाळीला मजल्यावरच्या सगळ्यांच्या करंज्या, चकल्या, लाडू करायला चाळीतल्या सगळ्या पोरी-बाया आपापली पोळपाट-लाटणी घेऊन जमायच्या. दसऱ्याच्या सायंकाळी मैदानात, रस्त्यावर सोनं लुटून, एकमेकांना छातीला छाती भिडवून भेटणाऱ्यांची झुंबड उडायची. पहिल्या मजल्यावर मयत झालं असेल तर खांदा द्यायला, प्रेतयात्रेत सामील व्हायला तिसऱ्या मजल्यावरच्या माणसाला बोलावायला लागत नसे. तो न सांगता मिलमध्ये सीएल टाकून वा खाडा करून हाराची पुडी घेऊन आपण होऊन हजर व्हायचा.

लालबागमधल्या चाळी पडताहेत, गिरण्यांचे मॉल होताहेत, मल्टिनॅशनलच्या शो रूम्स येताहेत, तशीच ही माणसं, या माणसांच्या प्रजातीही नष्ट होताहेत. जागतिकीकरणानं अनेक मध्यमवर्गीयांना लाभार्थी केलं असेल, पण या माणसांवर मात्र वरवंटा फिरवलाय. अशा या माणसांचा, त्यांच्या संस्कृतीचा इतिहास आज जागतिक सपाटीकरणात नष्ट होत चालला असताना त्याला ऐतिहासिक महत्त्व आलंय. मराठी साहित्यात लालबाग, परळ, वरळी अशा भागांत राहणारी माणसं यापूर्वी केंद्रस्थानी नव्हती. त्यामुळे त्यांच्या जीवनजाणिवा, संवेदना या कधीच मराठी साहित्याच्या आस्थेचा भाग नव्हत्या. पण वास्तव बदलत असतं. आज 'ग्रंथाली'सारख्या अग्रगण्य प्रकाशन संस्थेला 'लालबाग' या विषयावर पुस्तक काढावंसं वाटतं हे यासाठीच अर्थपूर्ण आहे. ग्रंथालीचं यासाठी अभिनंदन करायला हवं की तिनं आदिनाथ हरवंदे या लालबागला राहिलेल्या आणि तिथली संस्कृती जगलेल्या माणसाकडूनच हे काम करवून घेतलं. कदाचित उलटंही असेल. हरवंदेंचं लिखाण आधी सिद्ध झालं असेल आणि ग्रंथालीनं नंतर त्याला पुस्तकरूपी कोंदण दिलं असेल. पण इतिहास कोण सांगतं, यालाही महत्त्व आहे. आपल्याकडे उसनी माहिती घेऊन इतिहास सांगणारे बरेचजण आहेत. उलट, जे इतिहास घडवतात ते इतिहास लिहू शकत नाहीत. पण ग्रंथव्यवहार ज्यांच्या हातात आहे त्यांनी यात नीरक्षीर विवेक करून अस्सलतेलाच जवळ केलं पाहिजे. ज्यांना लिहिता येत नाही, अशांकडून मौखिक स्वरूपात इतिहास वदवून घेऊन तो शब्दबद्ध केला पाहिजे. यात त्रुटी राहतील हे खरं आहे, पण सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाण्याचा तो एक प्रभावी मार्ग आहे. सुदैवानं हरवंदेंसारखे लिहू शकणारे लोक लालबागमध्ये होते. अशा लिहित्या हातांनी आपला काळ, आपला परिसर त्यातल्या तपशिलांसह जिवंत केला तर तो एक मोठाच सामाजिक आणि सांस्कृतिक दस्तावेज ठरेल. लालबागच्या निमित्तानं असा मौलिक दस्तावेज आमच्या हाती दिल्याबद्दल आदिनाथ हरवंदे आणि ग्रंथालीचं अभिनंदन!

---

**जयंत पवार**
सी-११, भूमिग्रीन,
रहेजा इस्टेट, कुलुपवाडी,
बोरिवली (पू.), मुंबई-४०००६६.

काही प्रातिनिधिक उदाहरणांच्या साहाय्यानं, या सर्व घटना बघताना लेखकाचा प्रांजळ सूर सकारात्मक आहे. आज टॉवरसंस्कृतीच्या विळख्यात जात चाललेल्या 'लालबाग'चा गेल्या आठ दशकांचा सामाजिक इतिहास साकारलेला हा ग्रंथ उल्लेखनीय दस्तऐवज ठरणार आहे.




**लालबाग**
आदिनाथ हरवंदे
मूल्य : ४०० रुपये
सवलतीत : २४० रुपये

# प्रकाशन वृत्तांत

''विविध कला, संस्कृती आणि सामाजिक व राजकीय क्षेत्रांत लालबागमधील जनता नेहमी अग्रेसर होती. तरी लालबागकरांची नेहमी उपेक्षाच झाली. लालबाग हे पुस्तक वाचताना तिथले लहानपणचे दिवस पुन्हा आठवले,'' अशोक हांडे यांच्या हस्ते 'लालबाग' पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले, त्यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, ''आमचे लहानपण हलाखीत गेले, पण आम्ही रसरशीत जीवन जगलो. विविध क्षेत्रांत अनेक चांगली माणसे तयार झाली मात्र ती सगळीच समाजासमोर आली नाहीत. मुंबईचा विस्तार होताना कापडगिरण्या व कामगारांसाठी बांधलेल्या चाळी, दलदल बुजवत तेथे बांधल्या, पण मलबार हिल, दादर या भागात त्यांना प्रवेश मिळाला नाही. गल्लीपासून दिल्लीपर्यंतचे लोक लालबागच्या गणपतीला नवस करतात. सोन्याचा मुकुट गणपतीच्या मस्तकावर राहिला, आम्ही मात्र नंगेच राहिलो. लालबाग-परळच्या अलिकडे-पलिकडे गिरगावच्या शाळेत असो, वा दादरला कॉलेजात असो, आमची नेहमी उपेक्षाच झाली. आमच्याशी पूर्वग्रहदूषित व्यवहार नेहमीच होत राहिला. हा न्यूनगंड फोडून बाहेर पडण्याची जिद्द याच लालबागने आम्हाला दिली. मँचेस्टर नेस्तनाबूत झाले, तसे लालबाग होईल. म्हणून लढाईत जिंकलो आणि तहात हरलो हा इतिहासापासून धडा आपण घ्यायला हवा. जेवढा हिंसाचार बंगालच्या कामगार चळवळीत होतो तसा इथे कधी झाला नाही. कारण आमच्या मनात रुजलेली संस्कृती. लालबागचा इतिहास हरलेल्यांचा आहे. कारण इथल्या जनतेचे नेतृत्व भलत्यांच्याच हातात गेले.''

''गिरणगावातील कामगारांच्यात असलेली ऊर्जा कॉ. डांगे यांचा अपवाद वगळता कोणत्याच नेत्याला वापरता आली नाही. येथील समाज समूहाने राहत असल्याने दुसऱ्याचे दुःख जाणणारी माणसे आजुबाजूला होती. त्यामुळे लालबागमध्ये आमहत्या झाल्या नाहीत. लेखक, कलाकार यांनी आपल्या कलाकृतीतून लालबागचे चित्रण विकृत स्वरूपात केले. याबद्दल आपण त्यांना जाब विचारला पाहिजे. कारण पुढील काळात तेच सत्य म्हणून लोकम्हणून त्याचा स्वीकार करतील असे सांगत, ''पुलंनीही तीन पैशांचा तमाशात उल्लेखलेली चमेली




वास्तवात कधी नव्हती. ती त्यांनी मांडल्यामुळे लालबागबद्दल गैरसमज दृढ होतो. त्याबाबत मी स्वत: पुलंशी बोललो. परंतु लेखन स्वातंत्र्याच्या नावाखाली असत्य मांडण्याचा अधिकार पुलंनाही नाही.'' असे रोखठोक विचार त्यांनी मांडले.

या कार्यक्रमात त्यांनी या पुस्तकाच्या शंभर प्रती विकत घेतल्या. विविध कार्यक्रमांत भेट म्हणून हे पुस्तक आपण देणार आहोत असे सांगितले.

गिरणीकामगार नेते दत्ता इस्वलकर आपल्या भाषणांत म्हणाले,''लालबागची भौगोलिक रचना अशी आहे की, काम करणाऱ्या कामगारांना वाहतुकीचा त्रास होत नसे. शाळा-महाविद्यालये, हॉस्पिटल्स या सर्व सोयी इथे उपलब्ध आहेत. समाजाची सांस्कृतिक गरज भागविणारी नाट्यगृहे, सिनेमागृहे इथे आहेत. खेळाडू तयार करण्यासाठी क्रीडांगणेही आहेत. मुंबई शहराचा असा एक भाग समाजातील सर्व घटकांना सामावून घेत होता. खऱ्या अर्थाने मुंबई शहराला लालबागने जगवले.''

''आताची मुंबई ही गरिबांची न राहता, श्रीमंतांची झाली आहे. राजकीय पक्षांनी भावनिक प्रश्नांवर आंदोलने न करता या शहरातून मराठी माणूस बाहेर फेकला जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. अडीच लाख गिरणी कामगारांपैकी आज फक्त अडीच-तीन हजार गिरणी कामगार मुंबईत राहिले आहेत. कापड गिरण्यांच्या जमिनींवर गिरणी कामगारांसाठी सत्तर हजार घरे बांधण्यात येणार आहेत. त्यातील दहा हजार घरे येत्या दिवाळीपर्यंत बांधून पूर्ण होतील.''

''लालबाग या नावातच काहीतरी जादू आणि विलक्षण ताकद आहे. माझ्यासारखे अनेक कलावंत लालबागने घडविले. आदिनाथ हरवंदे यांनी हा इतिहास लालबाग या पुस्तकात लिहिला आहे. या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन लालबागच्या एखाद्या मैदानावर किंवा एखाद्या चाळीच्या पटांगणात होवो!'' अशी सदिच्छा सुलेखनकार अच्युत पालव यांनी व्यक्त केली.

आदिनाथ हरवंदे यांनी हे पुस्तक लिहिण्यामागची आपली भूमिका सांगितली,''माझे लहानपण लालबागमध्ये गेले, हे पुस्तक लिहिताना ते सर्व दिवस मला पुन्हा आठवले. गिरणी कामगार कामावरून कोरडी चपाती खाऊन घरी आल्यावर संध्याकाळी पेटीच्या सुरांबरोबर भजन म्हणत. लालबागमध्ये सांस्कृतिक वातावरण असल्यामुळे तेथे वेगळ्या कार्यशाळांची गरज भासली नाही.''

# ÷ध्यास आणि प्रवास' पुस्तकाचे प्रकाशन

''जिथे ज्ञानाचा अपमान होतो तिथे समाजाचे नुकसान होते. ध्यास घेतल्याशिवाय व प्रवास पूर्ण केल्याशिवाय कार्य पूर्णत्वास जात नाही. गेल्या चाळीस वर्षांत अनेक अडचणींचा सामना करावा लागला तरीही तुम्ही आपले काम सुरू ठेवले. समाज तुमच्यासारख्या लोकांमुळेच जगणार आहे. यापुढेही तुमचे काम सुरू राहावे.'' असे उद्‌गार डॉ. नंदकिशोर लाड यांनी 'ध्यास आणि प्रवास' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी काढले.

''पॅराप्लेजिक फाउंडेशनची सुरुवात सायन हॉस्पिटलमधील एका बराकीत झाली. पहिल्या दिवसापासून सुलभा वर्दे व त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजाने दखल घ्यावी असे काम केले आहे. आणखी आठ वर्षांनी या संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा होईल. त्यासाठी आपणास एखादा ब्रॅण्ड ॲम्बेसेडर शोधावा लागेल.'' असे अशोक मेहता म्हणाले.

आल्हाद गोडबोले यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्यावेळी




**ध्यास आणि प्रवास**
**सुलभा वर्दे**
मूल्य : २०० रुपये, सवलतीत : १२० रुपये

बोलताना ते म्हणाले, ''हे एका व्यक्तीचे आत्मकथन नसून, एका संस्थेचे आहे व ते विलक्षण श्रीमंत आहे. या पुस्तकात गेल्या बेचाळीस वर्षांतील अनेक चांगल्या-वाईट घटनांचा उल्लेख आहे. 'पंगू लंघयते गिरिम' हे म्हणणे सोपे आहे, पण त्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात ते अशा व्यक्तींनाच ठाऊक आहे. प्रकाशनापूर्वी अपंग व्यक्तींचे कार्यक्रम पाहताना असे वाटत होते की, ही माणसे खुर्चीतून उठून नाचू लागतील. सुलभा वर्दे यांनी आईच्या ममतेने या रुग्णांची सेवा केली आहे. या पुस्तकातून त्यांनी एका अर्थाने वेगळेच पसायदान सांगितले आहे.''

कार्यक्रमाच्या सुरुवातीस उषा धर्माधिकारी यांनी फाउंडेशनच्या कार्याची माहिती विस्ताराने सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रचालन हेमा गांधी व लतिका भानुशाली यांनी केले.

# असाही एक महाराष्ट्र

'असाही एक महाराष्ट्र' या पुस्तकाचे प्रकाशन मोहन आगाशे यांच्या हस्ते, ३ मे रोजी पुण्यात झाले. त्याचबरोबर बालगंधर्वच्या कलादालनात चित्रकार सुधीर पटवर्धन यांच्या हस्ते छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले.

यावेळी बोलताना मोहन आगाशे म्हणाले, ''लहानपणापासून छायाचित्रे पाहत आहोत, परंतु ती पाहण्याची दृष्टी आमच्याकडे नव्हती. ती या पुस्तकाने दिली आहे. आता असे जाणवते, की छायाचित्र पाहण्याचाही एक अभ्यास असतो. तो करायला हवा.''

प्रसिद्ध चित्रकार सुधीर पटवर्धन यांनी संदेश भंडारे यांचे कौतुक करताना नमूद केले की, ''वृत्तपत्रीय छायाचित्रण आणि अभिजात छायाचित्रकारिता यांचा उत्तम तोल संदेश भंडारे यांनी साधला आहे. या पुस्तकातून त्यांनी टिपलेला कष्टकरी महाराष्ट्र आपले वास्तव रूप घेऊन सामोरा येतो.''




**असाही एक महाराष्ट्र**
**संदेश भंडारे**
मूल्य : ३५० रुपये, सवलतीत : २१० रुपये

या पुस्तकाला प्रस्तावना लिहिलेले साहित्यअकादमी पुरस्कार विजेते कवी वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''कॅमेऱ्याच्या भिंगापलीकडची नजरही समजून घेतली पाहिजे. एखादी चित्रकृती कलाकृती असल्याखेरीज तिचा आशय आपल्यापर्यंत पोचत नाही. छाया-प्रकाशाने लिहिलेल्या या मजकुरातून परिचित वास्तवच व्यक्त झाले आहे. जाती-पाटे-वरवंटे घडवणारे लोक आपल्याला माहीत नाहीत असे नाही. परंतु आपल्या संवेदना बोथट झाल्या असल्याने त्यांची, त्यांच्या जगण्याची जाणीव आपल्याला होत नाही. भंडारे यांच्या छायाचित्रांतून जणूकाही अगदी पहिल्यांदा आपल्याला वास्तव दिसते. आपण पाहत असतो, आणि आपल्याला काही वाटतही असते. पाहण्याचे रूपांतर वाटण्यात व्हावे ही या छायाचित्रांची उपलब्धी आहे.''

## अशोक कोतवाल यांच्या ‘कुणीच कसे बोलत नाही’ काव्यसंग्रहास विविध पुरस्कार




महाराष्ट्र शासनाचा बाल कवी पुरस्कार
नाशिक येथील सम्यक प्रबोधन सभेचा कवी अरुण काळे अजातशत्रू पुरस्कार
शब्दवीर प्रकाशन, लातूर यांचा सिद्रामअप्पा चिल्ले काव्य पुरस्कार
असे तीन पुरस्कार आतापर्यंत लाभले आहेत.
किशोर सानप, गोविंद काजरेकर, म.द.हातकणंगलेकर यांनी
विविध नियतकालिकांतून या काव्यसंग्रहाचे कौतुक केले आहे.

**मूल्य : १०० रुपये सवलतीत : ६० रुपये**

## महिनाभरात दुसरी आवृत्ती प्रसिद्ध!



### पंखाविना भरारी!

**शरयू घाडी**

प्रसाद हा अतिविकलांग मुलगा. कोपरापुढे हातांची होणारी मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगी एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. असा हा प्रसाद आपल्या इच्छाशक्तीने, कर्तृत्वाने केवळ एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात एक दंतकथा बनला. शिक्षण, गायन, वक्तृत्व, चित्रकला यातील त्याने केलेली कामगिरी आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देते. प्रसाद म्हणजे निसर्गाचा अनाकलनीय आविष्कार. त्याच्या जीवनाची आणि त्याच्या आई-वडिलांच्या समर्पणाची ही कहाणी आहे.

**मूल्य : २०० रुपये सवलतीत : १२० रुपये**

# जनसंवाद वृत्तांत

स.न.

'जनसंवाद' ही वैचारिक चळवळ समाजाच्या हिताची आहे, या जाणिवेतून नुकताच घडलेला एक अनुभव महत्त्वाचा वाटला, म्हणून हे पत्र.

टेरी फॉक्स कॅन्सर निधीसाठी मार्च २, २०१० ह्या दिवशी मुंबईत एअर इंडियाच्या इमारतीपासून, मरीन लाइन्स उड्डाणपूलमार्गे ब्रेबॉर्न स्टेडियमपर्यंत अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी रनॅथॉनमध्ये (सामूहिक धावण्याचा उपक्रम) भाग घेतला होता; जोडीला होत्या जॉन अब्राहम, नगमा, सुनील शेट्टी ह्यांच्यासारख्या प्रसिद्ध व्यक्ती. जमलेला निधी मुंबईतीलच टाटा कॅन्सर हॉस्पिटलला बालकर्करोगावरील संशोधन कार्यासाठी देण्यात येणार होता. प्रेक्षक, सहभागी होणारे विद्यार्थी आणि प्रसंगाची योग्य दखल घेण्याकरिता जमलेले माध्यमप्रतिनिधी अशा जनसमुदायात प्रचंड उत्साह ओसंडून वाहत होता. कर्करोगासाठी निधी गोळा करण्याकरिता जगभरात अग्रस्थानी असलेल्या प्रस्तुत निधीने आयोजित केलेल्या ह्या उपक्रमाचे २०१० हे दहावे वर्ष होते.

टेरी फॉक्स ह्या धावपटूला कर्करोग झाल्याचे निदान झाल्यानंतर त्याच्या पायावर शस्त्रक्रिया करून एक पाय कापावा लागला होता. तो बहाद्दर धावपटू शस्त्रक्रियेनंतरसुद्धा एका पायावर निधी जमवण्यासाठी रोज धावला. काही दिवस नाही, तर तब्बल पाच महिने! आजच्या धावण्याच्या उपक्रमात माझा मुलगा, चैतन्यसुद्धा भाग घेणार होता. टेरी फॉक्सबद्दल सांगताना चैतन्य मला म्हणाला, ''टेरी स्वत:करता निधी जमा करत नव्हता, आई. निधीतून एक डॉलरसुद्धा मला नको, असं म्हणणारा आणि प्रतिमा स्वच्छ राहावी म्हणून अनेक औद्योगिक समूहांची प्रायोजकता नाकारणारा टेरी माझा हीरो आहे!''

एका महान कामासाठी आयोजण्यात आलेला तो धावण्याचा कार्यक्रम महत्त्वाचा होताच आणि त्या घटनेच्या समग्र बातम्या सर्व माध्यमांनी छायाचित्रांसकट सादर केल्या; पण आजच्या माझ्या पत्राचा उद्देश निराळाच आहे. घटनेच्या संदर्भात एरवी क्षुल्लक वाटणारा, नागरी वर्तणुकीत रोज नजरेस खुपणारा माझा अनुभव 'जनसंवाद'ने विचारात घ्यावा, असे वाटले म्हणून हे पत्र.

सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना संयोजकांनी धावताना घालण्यासाठी 'टी शर्ट'चे एक पाकिट दिले होते. मी जरी प्रेक्षक म्हणून आले होते, तरी पालक ह्या नात्याने मुलांच्या साऱ्या धावपळीकडे दुरून कौतुकाने पाहत होते. ठिकठिकाणच्या शाळा जमा झाल्या होत्या. मुले आपापल्या शाळांच्या वाहनाभोवती गोंगाट करत होती. टी-शर्टची पाकिटे वाटल्यावर, तो घालून धावायला तयार होण्यासाठी एकच झुंबड उडाली.

शाळाशाळांच्या मुलांमध्ये खटकणारी एक गोष्ट त्यावेळी मला जाणवली. ती बाब म्हणजे ज्या पिशव्यांतून ते शर्ट दिले गेले त्या पिशव्यांना मुलांकडून जसे हाताळले गेले, ती त्यांची वर्तणूक! काही शाळांतील मुलांनी सहजपणे त्या पिशव्या एका ठिकाणी टाकल्या व तो कचरा त्यांच्यातीलच एकाने गोळा करून नंतर विल्हेवाट लावण्यासाठी आपापल्या बसमध्ये नेऊन टाकला. इतरांनी मात्र स्वत:च्या टी-शर्टची पिशवी इतरत्र भिरकावून दिली.

परतताना आमचे त्या अनुभवावर बोलणे झाले आणि शाळेचे महत्त्व माझ्या ध्यानात आले. मला पटले, की मुलांच्या सामाजिक, सार्वजनिक ठिकाणच्या वर्तणुकीला वळण लावणे शाळेवर खूप अवलंबून असते. बघायला गेले तर जमलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना प्लॅस्टिकचे पर्यावरणावर होणारे विपरित परिणाम अभ्यासक्रमातून शिकवले गेले होते. मग, काही शाळांतील विद्यार्थीच योग्य रीतीने का वागले?

'जनसंवाद'चे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, की लोकशाही, नागरिकत्व व सामाजिक बांधिलकी ह्या विषयांवर बेतलेला एक आधुनिक अभ्यासक्रम बनवून देशभरातील शालेय शिक्षणात समाविष्ट करायचा आणि त्या जाणीवनिर्मितीतून उद्याच्या पिढ्या घडवायच्या. सार्वजनिक वर्तणुकीबाबत मी अनुभवलेल्या ह्या उदाहरणावरून एकीकडे अशा अभ्यासक्रमाचा अप्रत्यक्ष फायदा जसा माझ्या लक्षात आला, तशाच त्या उपक्रमाच्या मर्यादाही स्पष्ट झाल्या. निव्वळ सुयोग्य अभ्यासक्रम असून चालणार नाही; परिणामकारकता साधणे हे शिक्षकांवर, गरजेच्या मूल्यांना शाळांनी दिलेल्या महत्त्वावर, एकूणच, प्रत्येक शाळेतील वातावरणावर सुद्धा अवलंबून असणार! म्हणूनच, अशी सूचना करावीशी वाटते, की सुयोग्य अभ्यासक्रमाबरोबर शिकवणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यावर पण जनसंवादने भर दिला पाहिजे!

**डॉ. अस्मिता निमकर**
दादर, मुंबई.
asmitashekhar@gmail.com

---

**जनसंवादचे स्पष्टीकरण**

सूचना महत्त्वाची आहे हे मान्य करून 'जनसंवाद' गट प्रेषकाचे आभार मानतो. प्रस्तुत मुद्दा 'जनसंवाद'कडून दुर्लक्षित राहिलेला नाही. अभ्यासक्रमाच्या जोडीला तज्ज्ञ 'पेडागॉगी'वर सुद्धा (प्रत्येक विषयाच्या, मुद्द्याच्या शैक्षणिक प्रक्रियेवर, शिकवण्याच्या पद्धतीवर) गरजेचे विचार मांडतील. कोणत्याही प्रशिक्षणात (ट्रेनिंगमध्ये) 'ट्रेन द ट्रेनर' (प्रशिक्षकाचे प्रशिक्षण) अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, किंबहुना परिणामकारकतेकरिता ती गोष्ट अभ्यासक्रमापेक्षा जास्त महत्त्वाची ठरते. धन्यवाद!

**सु. गो. तपस्वी** (समन्वयक, जनसंवाद)
९७६६११५२२५३
suhas@fandsindia.com

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

# ‘ध्यास आणि प्रवास’ पुस्तकाचे प्रकाशन




प्रकाशनावेळी – लतिका भानुशाली, सुदेश हिंगलासपूरकर, लेखिका सुलभा वर्दे, डॉ. नंदकिशोर लाड, डॉ. एम.एन.शहाणे, आल्हाद गोडबोले, अशोक मेहता, डॉ. सरल डबीर, अश्रफ मच्छिवाला व प्रो. केसरसिंग

# केवळ साडेचार वर्षात ‘ताठ कणा’ची दहावी आवृत्ती प्रसिद्ध!



अनौपचारिक प्रकाशन समारंभात – सुदेश हिंगलासपूरकर, मोहन खैरे, प्रदीप गुजर, डॉ. सुभाष भेंडे, डॉ. दामाणी व लेखक डॉ. पी.एस. रामाणी

‘रुची’ हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी ‘ग्रंथाली’करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.